सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १३७ पाने : ८+४ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट, दिली खास भेटवस्तू

नवी दिल्ली: भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत भेट घेतली. आपल्या या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेतून नुकतेच भारतात परतलेल्या शुभांशू यांनी पंतप्रधान मोदींना एक खास भेट दिली. त्यांनी अंतराळात घेऊन गेलेला आणि भारताची शान म्हणून तेथे फडकवलेला 'तिरंगा' पंतप्रधान मोदींना भेट दिला.



या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी आणि शुभांशू शुक्ला यांच्यात विविध विषयांवर चर्चा झाली. शुभांशू यांनी अंतराळात मिळवलेले अनुभव, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील भारताची प्रगती, तसेच भारताची महत्त्वाकांक्षी 'गगनयान' मोहीम यावर दोघांनी सविस्तर संवाद साधला. पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स' वर एक पोस्ट करत या भेटीची माहिती दिली. त्यांनी लिहिले, शुभांशू शुक्ला यांच्यासोबत एक उत्तम संवाद झाला. अंतराळातील त्यांचे अनुभव, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती तसेच भारताच्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेवर आम्ही चर्चा केली. त्यांच्या या कामगिरीचा देशाला अभिमान आहे.

शुभांशू शुक्ला यांनी अंतराळातून काढलेली पृथ्वीची काही छायाचित्रेही पंतप्रधान मोदींना दाखवली. ही चित्रे पाहिल्यानंतर पंतप्रधानांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. शुभांशू शुक्ला यांनी अमेरिकेतील 'क्सिओम-४' या खाजगी अंतराळ मोहिमेतून २५ जून ते १५ जुलै या कालावधीत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर १८ दिवसांचा प्रवास केला. या काळात त्यांनी ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोग आणि २० हून अधिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.

शुभांशू शुक्ला यांचे हे यश भारताच्या अंतराळ इतिहासातील एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. 'गगनयान' मोहिमेद्वारे भारताला स्वतःचे अंतराळवीर अंतराळात पाठवायचे आहेत आणि शुभांशू यांचा अनुभव यात महत्त्वपूर्ण ठरेल.

# उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून निवड झाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांकडून राज्यपालांचे अभिनंदन

नवी दिल्ली: मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूर येथून परतताच थेट राजभवन गाठून मा. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) वतीने त्यांची उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवार म्हणून घोषणा झाल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

याआधी भारताच्या उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची निवड झाली त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांन ट्विट करून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले होते.



विविध राज्यांमध्ये संसद सदस्य आणि राज्यपाल म्हणून काम करताना, माननीय राज्यपाल राधाकृष्णन जी यांनी विविध कायदेविषयक आणि घटनात्मक बाबींमध्ये व्यापक कौशल्य मिळवले आहे. उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून त्यांची निवड आपल्या सर्वांना, महाराष्ट्रीयन म्हणून, अभिमानाने भरून टाकते, असेही म्हटले आहे.

# एअरटेल सेवा बंद! कॉल आणि इंटरनेट सेवेवरही परिणाम

मुंबई: एअरटेल डाउन डिटेक्टरनुसार देशभरातील एअरटेल ग्राहकांना गेल्या काही तासांपासून नेटवर्क आणि इंटरनेट समस्यांचा सामना करावा लागत आहे. ज्यांमध्ये मुंबई, दिल्ली-एनसीआर, अहमदाबाद, सुरत, हैदराबाद, बंगळुरू, कोलकाता आणि जयपूर तसेच कानपूर या शहरांतील एअरटेल वापरकर्त्यांना गेल्या काही तासांपासून मोबाइल नेटवर्क आणि इंटरनेटशी संबंधित समस्या येत आहेत. याबाबत स्वतः एअरटेलने सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली आहे. कंपनीने म्हटले आहे की ते शक्य तितक्या लवकर ही समस्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत.

अनेक ग्राहकांनी तक्रार केली आहे की त्यांच्या मोबाइलवर नेटवर्क सिग्नल दिसत आहे, परंतु कॉलिंग पूर्णपणे बंद आहेत. कॉल करता येत नाही किंवा आलेला कॉल उचलता स्वीकारता देखील येत नाही. या सर्व तक्रारी सोशल मीडियावर एअरटेलविरुद्ध दिसून आल्या. बहुतेक तक्रारी दिल्ली एनसीआर तसेच मुंबईमधील वापरकर्त्यांनी केलेल्या दिसून येत आहेत.

नेटवर्क खंडित होत असल्याची एअरटेलने केली पुष्टी

मोबाइल इंटरनेट बंद झाल्यामुळे, सोशल मीडिया वापरणाऱ्या वापरकर्त्यांना, ऑनलाइन पेमेंट आणि इतर डिजिटल सेवा वापरताना देखील समस्या निर्माण झाल्या आहेत. एअरटेलने सोशल मीडियावर या खंडित सेवेची अधिकृतपणे पुष्टी केली आहे. तसेच तांत्रिक टीम समस्या सोडवत असल्याचे कंपनीने निवेदनात म्हंटले आहे. त्याचप्रमाणे ग्राहकांच्या गैरसोयीबद्दल माफी देखील मागितली असून लवकरच सेवा सामान्य केली जाईल असे आश्वासन देखील दिले आहे.

३५०० हून अधिक तक्रारी - डाउन डिटेक्टरनुसार, दिल्ली-एनसीआर, जयपूर, कानपूर, अहमदाबाद, सुरत, मुंबई, हैदराबाद, बंगळुरू आणि कोलकाता येथील एअरटेल ग्राहकांना सध्या नेटवर्क आणि इंटरनेट समस्यांचा सामना करावा लागत आहे. सोमवारी (१८ ऑगस्ट २०२५) दुपारी ४:३० वाजेपर्यंत सेवा खंडित झाल्याच्या ३,५०० हून अधिक तक्रारी नोंदवल्या गेल्या. यापैकी ६८ टक्के वापरकर्त्यांनी फोन कॉलबद्दल तक्रार केली. १६ टक्के लोकांनी मोबाईल इंटरनेटबद्दल तक्रार केली तर १५ टक्के लोकांनी सिग्नल न मिळाल्याबद्दल तक्रार केली. ५ जी प्लॅन असूनही ४ जी नेटवर्कवरील डेटा कपातीबद्दल अनेक वापरकर्त्यांनी तक्रार केली आहे. अनेक लोकांनी सांगितले की, शहरी भागात राहूनही जिथे कव्हरेज सामान्यपेक्षा स्थिर आहे, त्यांना कमकुवत नेटवर्कचा सामना करावा लागत आहे.

## २० ते २५ घरांचा संपर्क तुटला, खेड दापोली रस्ता बंद

दापोली - शहरात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांत पाणी साचण्याची स्थिती निर्माण झाली आहे. शहरातील नाले तुडुंब भरल्यामुळे नाल्याचे पाणी रस्त्यावर आलं असून, नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः दापोली एसबीआय बँकेसमोरच्या परिसरात पाणी साचले असून, रस्त्यावरून वाहतूक करताना वाहनचालकांची कसरत होत आहे. अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहनांनी पाण्यात अडखळल्याची दृश्ये पाहायला मिळत आहेत.

दापोली तालुक्यातील मुरुड येथील लक्ष्मीनारायण मंदिर ते कर्दे याजवळ रस्त्यावरील जवळजवळ वीस ते पंचवीस घरांचा संपर्क तुटला आहे. नागरिकांनी पावसाचा इशारा व आज देण्यात आलेला रेड अलर्ट लक्षात घेऊन आवश्यकता असल्यास घराबाहेर पडावे, तसेच आपल्या भागात परिसरात पाणी भरल्यास कोणतीही मदत लागल्यास आपत्कालीन परिस्थितीत गावातील पोलीस पाटील, तलाठी, सर्कल यांना संपर्क करावा असा आवाहन दापोली तहसीलदार यांनी केल आहे.

# राज्यपालांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट, २१ ऑगस्ट रोजी उपराष्ट्रपतीपदासाठी दाखल करणार उमेदवारी अर्ज

नवी दिल्ली: एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आज दिल्लीत पोहोचले आहेत. विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यासाठी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि अनेक वरिष्ठ भाजप नेते उपस्थित होते. महाराष्ट्राच्या राज्यपालांचे यावेळी दिल्लीत जोरदार स्वागत करण्यात आले. दिल्लीत पोहोचल्यानंतर राधाकृष्णन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.



पंतप्रधान मोदींना भेटल्यानंतर सी.पी. राधाकृष्णन यांनी सोशल मीडियावर त्यासंबंधीत माहिती आणि फोटो देखील पोस्ट केला आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'आज मला आमचे प्रिय जननेते, आमचे सर्वात आदरणीय माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नवी दिल्लीत भेटून अभिमान वाटत आहे.'

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी सीपी राधाकृष्णन यांना उमेदवारी

भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएने रविवारी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी सीपी राधाकृष्णन यांना उमेदवार म्हणून घोषित केले. भाजप संसदीय मंडळाच्या बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली, ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित होते.

सीपी राधाकृष्णन कोण आहेत?

चंद्रपुरम पोन्नुस्वामी (सीपी) राधाकृष्णन यांनी ३१ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. यापूर्वी ते दीड वर्षे झारखंडचे राज्यपाल होते. झारखंडमधील त्यांच्या कार्यकाळात राष्ट्रपतींनी त्यांना तेलंगणाचे राज्यपाल आणि पुद्दुचेरीचे उपराज्यपाल अशी अतिरिक्त जबाबदारीही सोपवली. सीपी राधाकृष्णन यांना तामिळनाडूच्या राजकारणात आणि सार्वजनिक जीवनात चार दशकांहून अधिक अनुभव आहे. त्यांचा जन्म २० ऑक्टोबर १९५७ रोजी तामिळनाडूच्या तिरुप्पूर जिल्ह्यात झाला.

जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होत आहे. प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी २१ जुलै रोजी राजीनामा देण्याची घोषणा केली होती. ७४ वर्षीय धनखड ऑगस्ट २०२२ मध्ये उपराष्ट्रपती झाले, परंतु दोन वर्षांनीच त्यांनी या पदाचा राजीनामा दिला.

## नांदेड जिल्ह्यात रावणगावचे ग्रामस्थ गाढ झोपेत असताना आभाळ फाटलं

नांदेड : मराठवाड्याच्या काही भागांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. नांदेडच्या मुखेड तालुक्यात रविवारी रात्री ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने सहा गावं पाण्याखाली गेली आहेत. यापैकी दोन गावांमध्ये ८० नागरिक अडकून पडले आहेत. पाण्याची पातळी वाढल्याने या नागरिकांना वाचवण्यासाठी राज्य आपत्ती निवारण दलाला बोलावले आहे. लहान होड्या आणि बोटींच्या साहाय्याने नागरिकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उद्गीर येथील धरणक्षेत्राच्या वरच्या भागात पाऊस झाला. त्यामुळे एका रात्रीत १८ फूट पाणी वाढले आहे. धरणक्षेत्रात प्रचंड पाऊस झाल्याने मुखेड तालुक्यातील सहा गावं पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. मुखेड तालुक्यात फारसा पाऊस झालेला नाही. मात्र, तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या उद्गीर येथील धरणक्षेत्रात मुसळधार पाऊस झाला आहे. रविवारी रात्री गावकरी झोपल्यानंतर रात्री दोनच्या सुमारास उद्गीर भागात ढगफुटीसदृश पाऊस झाला. त्यामुळे लेंडी नदीला पूर आला. मुखेड तालुक्यातील भेंडेगाव, बुद्रुक, भिंगोली, हसनाळ, रावणगाव, भासवाडी आणि मारजवाडी ही सहा गावं पाण्याखाली गेली आहेत. यापैकी चार गावांमधील नागरिकांना रात्रीच सुखरुपपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, रावणगाव येथील गावठाणात ८० जण अडकले आहेत. तर हसनाळ येथे नऊ जण अडकले आहेत. या सगळ्यांच्या मदतीसाठी सकाळी सहा वाजल्यापासूनच एसडीआरएफ, उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार संपूर्ण यंत्रणेसह बचावकार्यासाठी दाखल झाले आहेत.

# राज्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांचे सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश

मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला.

यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आपत्ती व्यवस्थापन अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.



बैठकीत विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील पावसाबाबतची माहिती सादर केली. रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांत अधिक पाऊस झाला असून, हवामान खात्याने १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सतर्क राहण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

मागील दोन दिवसांत राज्यात विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आहे. कोकणातील काही नद्यांनी धोकापातळी ओलांडली असून जळगावमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अलमट्टीबाबत कर्नाटक सरकारशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून, सध्या धोका नसला तरी यंत्रणा सतर्क ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले. मुखेडमधील परिस्थिती नियंत्रणात आली असून, विष्णुपुरीकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील ८०० गावे बाधित झाली आहेत. दक्षिण गडचिरोलीत प्रशासन सतर्क आहे. अकोला, चांदूररेल्वे, मेहकर, वाशिम येथे परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. विदर्भात प्राथमिक अंदाजानुसार २ लाख हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले आहे.

मुंबईत आज सकाळपासून अवघ्या आठ तासांत १७० मिमी पाऊस झाला आहे. शहरात पाणी तुंबल्यामुळे दोन ठिकाणी वाहतूक प्रभावित झाली. रेल्वे, मेट्रो व इतर वाहतूक सुरळीत सुरू आहे. पुढील १० ते १२ तास मुंबईसाठी अत्यंत महत्वाचे असून, प्रशासनाने काळजी घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. उद्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शाळांना सुटी जाहीर करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासन व महापालिकांना देण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना दिलेल्या सूचनांमध्ये, एसएमएस अलर्ट पाठवताना वेळेचा अचूक उल्लेख करावा, येणारे अलर्ट गांभीर्याने घ्यावेत, स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तातडीच्या मदतीसाठी मंत्रालय गाठण्याची गरज नाही, स्थानिक पातळीवरच निधी व अधिकार देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामे योग्य पद्धतीने करण्याचे निर्देशही देण्यात आले. धोक्याची पातळी वाढण्यापूर्वी अन्य राज्यांशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले. पर्यटकांच्या ठिकाणी पोलिसांनी सतर्क रहावे, दरडी कोसळणाऱ्या भागात आधीच यंत्रणा कार्यरत करावी, तसेच निवारा केंद्रात भोजन, शुद्ध पाणी व पांघरूण यांची पुरेशी सोय करावी, असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

# मुंबई, ठाण्यात पावसामुळे वाहतूक विस्कळीत; मंगळवारी शाळांना सुट्ट्या जाहीर

## ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई मनपांसह पालघर व बुलढाण्यातील शाळा, महाविद्यालयांना सुट्टी

मुंबई : सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पावसाने मुंबई शहर व उपनगरातील जनजीवन विस्कळीत झाले होते. मध्य, पश्चिम व हार्बर मार्गावरील उपनगरीय रेल्वेसेवा उशिराने धावत असून अनेक ठिकाणी पाणी साचल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. विमानसेवेवरही पावसाचा मोठा परिणाम झाला होता. मुसळधार पावसामुळे ठाणे मनपा, केडीएमसी, नवी मुंबई, पालघर व बुलढाण्यातील अनेक शाळांनाही सुट्टी देण्यात आल्या आहेत.



मुंबईतील चेंबूर परिसरात मुसळधार पावसामुळे पालिकेच्या रुग्णालयात चार ते पाच फूट पाणी शिरले त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पाण्यातून वाट काढत रुग्णालयात प्रवेश करावा लागला. तर चुनाभट्टी विभागातील स्वदेशी मिल कामगाराच्या घरात पाणी शिरल्याने अत्यावश्यक वस्तूंचे नुकसान झाले. याच भागात एमएमआरडीएची संरक्षक भिंत कोसळून सात झोपड्यांचे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी टळली.

किंग सर्कल परिसर गुडघाभर पाण्याखाली गेला असून वाहनचालकांची मोठी तारांबळ झाली. सायन, माटुंगा आणि घाटकोपर परिसरात वाहतूक कासवगतीने सुरू होती. सायन बसस्थानक पूर्णपणे पाण्याखाली गेले. महापालिका कर्मचारी व वाहतूक पोलीस पाण्याचा निचरा करण्याचा प्रयत्न करत असले तरी सततच्या पावसामुळे प्रयत्न निष्फळ ठरले.

ठाण्यातील परिस्थितीही गंभीर होती. अवघ्या चार तासांत ३१.२२ मिमी पावसाची नोंद झाली. सकाळी ११ ते १२.३० या वेळेत सर्वाधिक १६.२६ मिमी पाऊस पडला. ठाणे महापालिकेने अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे आज व उद्या सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली. केडीएमसी, नवी मुंबई, पालघर व बुलढाण्यातील शाळांनाही सुट्टी देण्यात आली आहे.

गेल्या सहा तासांत मुंबईत १७० मिमी तर केवळ चेंबूरमध्ये १७७ मिमी पाऊस पडला. पावसामुळे मुंबई लोकलची वाहतूक १४ ठिकाणी प्रभावित झाली. गाड्या बंद न पडता केवळ कासवगतीने धावत होत्या. दुपारी चारनंतर मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना घरी जाण्याची परवानगी देण्यात आली.

आज सायंकाळी सहा ते साडेसहा दरम्यान हायटाईडची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. पुढील १० ते १२ तास मुंबईत पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. संध्याकाळी मिळणाऱ्या अहवालानुसार उद्याच्या शाळांविषयी निर्णय घेतला जाणार आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबईत सर्वत्र पावसाने कहर सुरूच असल्याने नागरिकांना अक्षरशः पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे. प्रशासन व महापालिकेकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून निचऱ्याचे काम सुरू आहे. मात्र पावसाचा जोर पाहता मुंबईकरांना आणखी काही दिवस हा तगडा सामना करावा लागण्याची चिन्हे आहेत.

# विमान प्रवासावर पावसाचा परिणाम!

मुंबई: सलग तिसऱ्या दिवशी, सततच्या पावसामुळे शहरात मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कार्यावरही याचा परिणाम झाला. कमी दृश्यमानता आणि खराब हवामानामुळे अनेक विमानांना 'होल्डिंग पॅटर्न'मध्ये थांबावे लागले, ज्यात किमान एक विमान दुसऱ्या ठिकाणी वळवण्यात आले. सरासरी, विमानांना जवळपास ५६ मिनिटांचा विलंब झाला.



महत्त्वाच्या रस्त्यांवर झालेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना विमानतळावर पोहोचणे किंवा तेथून बाहेर पडणे कठीण झाले. बिघडलेल्या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून, 'उडचख-' ने प्रवाशांना त्यांच्या संबंधित विमान कंपन्यांकडून उड्डाण स्थिती तपासण्याचे आणि शेवटच्या क्षणी होणारा त्रास टाळण्यासाठी नेहमीपेक्षा लवकर पोहोचण्याचे आवाहन केले. इंडिगोने मुंबईतील परिस्थितीची गंभीरता मान्य केली, आणि म्हटले की, सततच्या पावसामुळे विमानतळाच्या आसपासची वाहतूक खूप मंदावली आहे. त्यांच्या संदेशात प्रवाशांना लवकर निघण्यास आणि त्यांच्या प किंवा वेबसाइटद्वारे अद्ययावत राहण्यास सांगितले.

आकासा एअरनेही मुंबई, बेंगळुरू, गोवा आणि पुणे येथून निघणाऱ्या प्रवाशांसाठी असाच इशारा जारी केला, ही सर्व शहरे जोरदार पावसामुळे प्रभावित झाली आहेत. एअरलाइनने अतिरिक्त प्रवासाचा वेळ नियोजित करण्याचा आणि त्यांच्या थेट स्थिती लिंकद्वारे उड्डाण वेळापत्रकावर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला.

भारतीय हवामान विभागाने पुढील काही दिवसांतही पाऊस सुरू राहण्याचा अंदाज व्यक्त केल्यामुळे, प्रवाशांना सतर्क राहण्याचे आणि प्रवास करताना विलंबाचा विचार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



चौथा श्रावण सोमवार शेवटचा असल्यामुळे बीड शहरातील कंकालेश्वर मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. (छाया कृष्णा शिंदे)

# भगवान शंकराला शरण गेलं की मोक्षप्राप्ती होते-श्री गणेश्वर शास्त्री द्रविड



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ ऑगस्ट**

समर्पण प्रतिष्ठान बीडच्या वतीने पद्मश्री श्री. गणेश्वरशास्त्री द्रविड यांचा भव्यदिव्य असा पूजन व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आशीर्वचन देताना पूज्यश्री द्रविड गुरुजी यांनी अग्नि ,पाणी, वायू, सूर्य, चंद्र, पृथ्वी, अग्नीहोत्र, वाणी अशा अष्टमूर्त स्वरूपात भगवान शंकर आहेत म्हणून तो जगतोध्दारक ही आहे, या स्वरूपात भगवान प्रत्यक्षात आपल्या सभोवती आहे पण आपण त्याला ओळखत नाही,

आपणास सर्व संरक्षण देवाकडून आपण अपेक्षित ठेवतो तेव्हा नियमाचे पालन, वेदशास्त्र, ग्रंथ आज्ञेचे पालनही केलं पाहिजे, अशा खूप सोप्या शब्दात श्री गणेश्वर शास्त्री द्रविड यांनी समजावून सांगितले आणि जीवनात एकवेळा तरी अयोध्येत प्रभू श्रीराम चे दर्शन घेऊन कृपा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा असे आवाहनही केले.सलग दोन तास वेदाभ्यासाने प्रगटलेले ज्ञानाअमृत ऐकताना सर्व उपस्थित भक्तीरसात मंत्रमुग्ध झाले होते.यावेळी ह. भ. प. महादेव महाराज चाकरवाडीकर ,वेदमूर्ती श्री ईश्वरजी घनपाठी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा संयोजक प्रा. सतीश पत्की यांनी २०१३ पासून आईच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्या पासून श्री द्रविडशास्त्रींचे आशीर्वाद मिळत आहेत. काही व्यक्ती पुरस्काराने मोठ्या होतात, काही पुरस्कार व्यक्तीमुळे ओळखले जातात. वेद अभ्यास धर्मसेवा कार्यात प्रतिष्ठान यापुढेही कार्यरत राहील. हा समस्त बीडकर यांच्या वतीने सत्कार पूजन आहे, असे प्रास्ताविकातून प्रा.पत्की यांनी मनोगत मांडले.

वेदमूर्ती श्री ईश्वरजी घनपाठी गुरुजी यांनी सूर्याची केवळ पूजाच होऊ शकते ,त्याचा वेगळा परिचय देण्याची गरज नसते. पुरुष स्वरूपातील माता सरस्वती स्वरूपाचे प्रतीक हे श्री गणेश्वर शास्त्री द्रविड आहेत. असे गौरवोद्गार श्री. ईश्वरजींनी काढले.ह. भ. प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी संत विचाराचे स्वागत केलं पाहिजे. श्री गणेश्वर शास्त्री यांच्या आशीर्वादाची आपल्या सर्वांना गरज आहे, अशी भावना चाकरवाडीकर महाराजांनी यांनी व्यक्त केली. श्री द्रविड शास्त्रींचे पाद्यपूजनानंतर यथोचित सत्कार प्रा. सतीश पत्की ड. कालिदास थिगळे नाना, विनायक महाराज पाटांगणकर, ह भ प मस्के महाराज ,सुधाकरराव कुलकर्णी ,संजय गुळजकर यांनी केला. सूत्रसंचालन हेमंत बडवे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री प्रविण इंगळे यांनी केले. या वेळी समस्त बीडकर आणि सर्व क्षेत्रातील मान्यवरांची लक्षवेधी उपस्थिती रविराज मंगल कार्यालयात होती.

# अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रियेसाठी २१ ऑगस्ट रोजी उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ ऑगस्ट**

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादित होणाऱ्या शेतमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडित घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेल बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यापर्यंत त्यांच्या गरजेनुरूप योग्यवेळी पोहचवीने आणि त्यासाठी आवश्यक साहय्य व सोयी सुविधा पुरविणे निकडीचे आहे.

कृषी विस्तार कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरिता करावयाच्या विविध उपयोजनांसाठी कृषी विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे प्रदेश दौरे ही योजना राबविण्यात येत आहे. तसेच बीड जिल्ह्यातील महिला १, केंद्र, राज्य कृषी पुरस्कार प्राप्त, पिक स्पर्धा विजेते शेतकरी -१. इतर शेतकरी-३ असे एकूण ५ शेतकऱ्यांचा देशाबाहेरील अभ्यास दौरे याबाबत लक्षांक प्राप्त आहे.

त्यानुसार प्रदेश अभ्यास दौऱ्याकरिता इच्छुक शेतकऱ्यांचे प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी मार्फत मागविण्यात आले असून प्राप्त अर्जाची संख्या लक्षांकापेक्षा जास्त प्राप्त असल्याने प्रदेश अभ्यास दौरा मार्गदर्शक सूचना सन २०२५-२६ नुसार सोडत पद्धत अवलंबावी असे निर्देशित केले आहे. त्यानुसार प्राप्त अर्जामधून सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी सोडत प्रक्रिया दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी एक वाजता जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय बीड येथे करण्यात येणार आहे.अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रियेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी कळविले आहे.

# मुला मुलींसाठी शासकीय वस्तीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ ऑगस्ट :**

शैक्षणिक सन २०२५-२६ करिता इतर मागास प्रवर्गातील मुला मुलींसाठी शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या मुला मुलींच्या वस्तीगृहामध्ये तसेच आधार व स्वयम योजना अंतर्गत १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.

शासनाच्या https:// hmas.mahait.org या ऑनलाइन पोर्टलवर बी. एम./ बी.कॉम, बी.एस.सी अशा बारावी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./ एम.एस.सी असे पदवीनंतरचे पदव्युतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ दिली आहे.व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून दिनांक १७ ऑगस्ट २०२५ ते २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज भरून ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधित वस्तीगृहास विहीत मुदतीत सादर करावे. जिल्ह्यातील इमाव.विमाप्र.विजाभजविद्यार्थ्यांनां वसतीगृह आधार व स्वयम योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ओबीसी मुलामुलींचे वस्तीगृह बीड येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील शेतकऱ्याचे अतिवृष्टीमुळे आलेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ द्या-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१८ ऑगस्ट**



अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्याचे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच फळबागाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे नुकसान झालेल्या शेतकऱ्याच्या पिकाचे पंचनामे तात्काळ करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केलेली आहे.

सद्यस्थितीत यावर्षी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीमुळे झाल्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिके सोयाबीन, कापूस, मूग, उडीद तसेच कांदा पिकाचे व फळबागाचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेतकरी परेशान झाला आहे.

अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतात पाणी साचून पिके नष्ट झालेली आहेत तसेच फळबाग शेतकऱ्यांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.

तरी अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्याचे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी यांनी केलेली आहे.

# कै. वंसतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील बीड दौरा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ ऑगस्ट**

कै. वंसतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२. ०० वाजता छत्रपती संभाजीनगरहून बीडकडे प्रयाण.दुपारी २.०० वाजता विश्राम भवन, बीड येथे आगमन व राखीव. दुपारी ३.०० वाजता तहसीलदार बीड यांनी निश्चित केलेल्या प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. दुपारी ४.०० वाजता सोयीनुसार अमरावतीमार्गे काटोलकडे प्रयाण.

# अंबाजोगाईत पदोपदी-क्षणोक्षणी स्नेहसंवर्धनाचा अनुभव-प्रा.डॉ.विवेकानंद राजमान्य

## प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य यांना आंतरभारतीचा स्नेहवर्धन पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१८ ऑगस्ट**

आंतरभारतीच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने दर वर्षी प्रमाणे १५ ऑगस्ट रोजी १२ वा स्नेहवर्धन पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. या वर्षी अंबाजोगाई परिसरात अनेक इंजिनियर घडवणारे स्थापत्य शास्त्राचे प्रमुख प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य यांना हा पुरस्कार देण्यात आला. अध्यक्षस्थानी आंतरभारती, आंबाजोगाईच्या अध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बरुरे होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आंतरभारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्राचार्य पांडुरंग नाडकर्णी (गोवा), अमर हबीब (विशेष अतिथी तथा मार्गदर्शक आंतरभारती), सिंधुताई पनिकर (गतवर्षीच्या सत्कारमूर्ती) व कार्यक्रमाचे संयोजक ऍड. प्रवीण बजाज मंचावर उपस्थित होते. हा पुरस्कार गतवर्षीच्या सत्कारमूर्ती सिंधुताई पनिकर यांच्या हस्ते व मंचावरील उपस्थितीत देण्यात आला.

स्नेहवर्धन पुरस्कार

सानेगुरुजी यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी आंतरभारतीची स्थापना केली होती. तेच उद्देश्य पुढे नेणारा हा पुरस्कार आहे. हा पुरस्कार अन्य राज्यातून आलेल्या, अंबाजोगाईत स्थायिक झालेल्या व आंबाजोगाईच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्तीला दिला जातो.

प्रेमळ माणसांचे गाव

डॉ विवेकानंद राजमान्य सुमारे ३० वर्षांपूर्वी आंबाजोगाईत आले व आंबाजोगाईचे झाले. ते म्हणाले की, अंबाजोगाईची माणसे खूपच प्रेमळ आहेत. मला येथे काम करताना कधीच परकेपण वाटले नाही. गावातील लोकांनी मी अन्य राज्यातील परका माणूस आहे अशी जाणीव होऊ दिली नाही.

प्रमुख पाहुणे प्रा. नाडकर्णी सर, मार्गदर्शक अमर हबीब व प्राचार्य बी आय खडकभावी सर यांनी आपल्या मनोगतातून सानेगुरुजीचे विचार, आंतरभारतीचा उद्देश व कार्यप्रणाली याविषयी प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. शैलजा बरुरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचन ऍड. प्रवीण बजाज यांनी केले. आंतरभारतीचे सभासद, गावचा सामाजिक वारसा पुढे नेणारे नागरिक तथा प्रा. डॉ. विवेकानंद राजमान्य सरांचे सहकारी, कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# निवडणूक आयोगावर राहूल गांधी यांनी केलेल्या आरोपांशी परळी काँग्रेस सहमत-बहादूर भाई

## परळीतील मतदार याद्यांमध्येही गडबडीचा केला आरोप

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ ऑगस्ट**

परळी प्रतिनिधी कांग्रेस नेते राहूल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांशी परळी काँग्रेस सहमत असल्याचे सांगत २०१९ पासून परळी विधानसभा मतदारसंघाच्या यादीतही मोठी गडबड असल्याचा आरोप परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई यांनी आज दिनांक १२ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला. यावेळी त्यांनी परळी विधानसभा मतदारसंघातील झालेल्या गडबडीचे काही व्हिडिओ चित्रण पत्रकारांना दाखविले.

शहरातील नवीन व्हीआयपी रेस्ट हाऊस येथे बारा ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता शहर काँग्रेसच्या वतीने मतचोरी में हेराफेरी या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेचा काही भाग पत्रकारांना दाखविण्यात त्यानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई पत्रकारांशी बोलताना म्हणाले की,परळीतील निवडणुकीत सुध्दां राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांसारखी झाली आहे. निवडणुकांमध्ये राज्य शासनाच्या अधिन कर्मचारी निवडणूक काम करतात. ते स्थानिक खासदार, आमदार,यांचेच ऐकतात आणि तसेच त्यांना अपेक्षित आहे त्याप्रमाणे कामकाज करतात.मग निवडणूक यादी बनविणारे बीएल.ओ.प्रशासनाच्या अंतर्गत काम करत असतात.तो प्रामाणिक पणे काम करत नाही.सदर बीएलओ स्थानिक नेत्यांच्या हवाली फार्म देतात आणि भरुन घेतात.



परळी शहरात प्रत्येक बुथवर १०० ते१५० अतिरिक्त मते असल्याचे सांगताना एकूणच मतदार यादीतील घोळ याबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिले.साधारण दहा हजार मते बाहेरची जोडली गेली आहेत.भाजपा अनेक बाहेरील मतदारांचा वापर करते. आणि मतदानाच्या दिवशी या बाहेरील लोकांना परळीत आणले जाते.परळीतही असे अनेक बाहेरील मतदार दुपारी चार नंतर मतदान करतात.परळीत हे सर्व २०१९ पासून सुरू आहे.

मतदार यादी मध्ये घोळ करण्याचे हे काम सत्ताधारी पक्षाकडील नगरसेवक, निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले असे कार्यकर्ते हे काम करतात.मतदान कार्ड बाहेरील लोकांची बनवून घेतली जातात.मृत मतदारांचेही परळीत मतदान झाले निवडणूक आयोग ४५ दिवसांत डाटा डिलिट का करत आहे.सीसीटिव्ही फुटेज का देत नाही.असा सवालही बहादूर भाई यांनी आज केला.परळीत मतदाराऐवजी दुसरेच कार्यकर्ते बटन दाबत होते.

प्रशासनही सत्ताधाऱ्यांना सहकार्य करते. विधानसभा निवडणुकीत फक्त २५ कॅमेरे चालू होते.बाकी बंद होते.निवडणूक अधिकारी यांना तक्रार केली परंतु काहीही फरक पडला नाही.आम्ही आतले नाही तर बाहेरचे कॅमेरे पाहतो. असे उत्तर अधिकाऱ्याकडून ऐकायला मिळाले त्यामुळे एकूणच निवडणुकीत कर्मचारी हा कोणाच्यातरी सांगण्यावरून काम करत होता हे दिसून आल्याचे ते म्हणाले.

सध्या हा प्रश्न जनतेसमोर आल्यामुळे आम्ही परळीतील घडलेल्या प्रकाराची माहिती प्रकारांसमोर मांडत आहोत.निजामाबाद येथे नगर सेवक पदाची निवडणूक लढविणारा व्यक्ती याने परळीत मतदान केले.याचे आमच्याकडे पुरावे आहेत.परळीच्या मतदार यादीतही प्रशासनाच्या मदतीने घोळ केला जात आहे. डबल नावे टाकली जातात , हैदराबाद येथे मागील वीस वर्षांपासून राहणा-या व्यक्तीची परळीत नावे आहेत. ही सर्व नावे प्रशासनाने वगळावेत व अद्यावत कोणतेही गडबड नसलेले आणि घोटाळा नसलेल्या याद्या निवडणूक आयोगाने आगामी काळात प्रसिद्ध कराव्यात असे आवाहनही बहादुर भाई यांनी केले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे प्रकाश देशमुख, गुलाब देवकर, रणजीत देशमुख, एत्तेशाम,सिरसाट आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरीभाऊ बागडे (नाना) यांचे छत्रपती संभाजीनगर विमानतळावर भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी स्वागत केले. या वेळी फुलंब्रीच्या आमदार सौ. अनुराधा चव्हाण, भाजपाच्या ज्येष्ठ पदाधिकारी विमलताई तळेगावकर, मा. नगरसेविका व देवगिरी बँकेच्या संचालिका श्रीमती जयश्रीताई किवळीकर , शहराचे कोषाध्यक्ष संजय खनाळे, सचिव अशोक जगधने आदी उपस्थित होते.**

## चिमुकल्यांची देशभक्तीने भरलेली प्रभातफेरी, ड्रीमलँड प्री-स्कूल, कन्नड येथे उत्साहात



कन्नड – स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने ड्रीमलँड प्री–स्कूल, कन्नडच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीचा ओघ ओसंडून वाहावा अशी प्रभातफेरी काढत सर्वांचे मन जिंकले. तिरंगा हातात, डोक्यावर रंगीबेरंगी टोपी, देशभक्तीच्या घोषणांचा गजर आणि चेहऱ्यावर देशप्रेमाचा झळाळता उत्साह पाहून उपस्थितांचे पाऊल थबकले. शाळेचे संचालक वर्षा लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. ध्वजारोहण पालक प्रतिनिधी रघुनाथ गावंडे यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर शाळेच्या परिसरात व शहरातील ठिकठिकाणी प्रभातफेरी काढून चिमुकल्यांनी देशभक्तीचा संदेश दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक गौरी घोडके, अनुजा शेजूळ, पूजा लहाने तसेच पालकांनी विशेष परिश्रम घेतले. या वेळी सचिन साबळे, प्रकाश शेलार, अमोल साबळे, संदीप फुलारे, स्वप्नील राठोड, सोमीनाथ जाधव यांसह अनेक पालक व मान्यवर उपस्थित होते. प्रभातफेरी व सांस्कृतिक कार्यक्रमानंतर सर्वांना गोडधोड वाटप करण्यात आले. शेवटी चिमुकल्यांच्या गगनभेदी भारत माता की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमला आणि उपस्थितांच्या डोळ्यांत अभिमान दाटला.

## भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची

पुणे : वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी) चे कुलगुरू डॉ. जी. विश्वनाथन म्हणाले की, २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी शिक्षणाचा विकास करणे खूप महत्वाचे आहे. ते आज व्हीआयटीच्या ४० व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. महादेवन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून समारंभाला उपस्थिती लावली आणि पदवीधरांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली. यावेळी ८,३१० पदवीधर विद्यार्थी, २,८०२ पदव्युत्तर विद्यार्थी आणि ४५१ विद्यार्थ्यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. याशिवाय, २०३ विद्यार्थ्यांना त्यांच्या रँकिंगच्या आधारे सन्मानित करण्यात आले, तर ६८ उत्कृष्ट विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. तामिळनाडू पोलिस अकादमीचे संचालक डीजीपी संदीप राय राठोड यांना आपत्ती व्यवस्थापनात पीएचडी प्रदान करण्यात आली.

## फुफ्फुसातील दुर्मिळ बुरशीजन्य संसर्गावर उपचार

पुणे : बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांना स्वस्थ व्यक्तींमध्ये देखील फुफ्फुसातील बुरशीजन्य संसर्गामध्ये (लंग फंगल इन्फेक्शन) वाढ झाल्याचे निरीक्षण केले आहे. हॉस्पिटलमध्ये पूर्वी पूर्णतः स्वस्थ असलेल्या दोन रुग्णांवर पल्मोनरी ॲस्परजिलोसिस या आजारावर उपचार करण्यात आला. यामधून निदर्शनास येते की, हंगामी घटकांमुळे (जसे प्रदूषण व वाढलेली आर्द्रता) व्यक्ती असुरक्षित झाले आहेत आणि हे बदल अत्यंत चिंताजनक आहेत. पहिला रुग्ण, ४६ वर्षीय पुरुष, कोरडा व सततचा खोकला, अधूनमधून येणारा ताप आणि वजन कमी होणे या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. छातीच्या स्कॅनमध्ये डाव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात न्यूमोनियाचे निदान झाले, ज्यामुळे डॉक्टरांनी सुरुवातीला क्षयरोग (टीबी) किंवा कर्करोग असण्याची शक्यता व्यक्त केली. मात्र, ब्रॉन्कोस्कोपी व बीएएल (ब्रॉन्कोॲल्व्हिओलर लावेज) तपासणीत ॲस्परजिलस फ्लॅव्हस ही कमी ज्ञात बुरशी प्रजाती आढळली. सध्या रुग्ण पूर्णपणे बरा झाला आहे.

## इंडिगो आणि आयडीएफसी फर्स्ट बँक यांनी सह-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सुरू केले

पुणे : भारतातील सर्वात पसंतीची एअरलाइन इंडिगो आणि आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज 'इंडिगो आयडीएफसी फर्स्ट क्रेडिट कार्ड' लाँच करण्याची घोषणा केली आहे. हे एक अनोखे क्रेडिट कार्ड आहे, जे एकाच अर्जाद्वारे मास्टरकार्ड आणि रुपे या दोन्ही नेटवर्कचे फायदे एकत्र करते, ज्यामुळे कार्डची स्वीकृती अधिक ठिकाणी होते आणि पेमेंटमध्ये जास्तीत जास्त लवचिकता मिळते. ही भागीदारी ग्राहकांना मूल्य, सोय आणि दैनंदिन फायदे देण्यासाठी दोन्ही कंपन्यांची समान बांधिलकी दर्शवते. हे कार्ड लाइफस्टाइल सुविधा, कमी फॉरेक्स मार्कअप, आकर्षक ट्रिप कॅन्सलेशन कव्हर आणि इंडिगो फ्लाइट बुकिंग, माईलस्टोन खर्च तसेच दैनंदिन खरेदीवर जलद रिवॉर्ड्स देऊन प्रवासाचा अनुभव अधिक चांगला बनवते. या लाँचसह, इंडिगोने 'इंडिगो ब्लूचिप लॉयल्टी प्रोग्राम' पोर्टफोलिओ आणखी मजबूत केला आहे, ज्यामुळे ग्राहकांना दैनंदिन खर्चातून 'इंडिगो ब्लूचिप्स' मिळवण्याचे अधिक मार्ग उपलब्ध होतात – आणि प्रत्येक व्यवहार त्यांच्या पुढील फ्लाइटसाठी मोजला जातो.

# वेताळवाडी नदीच्या पुरात अडकलेल्या सात पर्यटकांचे ग्रामस्थांनी वाचविले प्राण

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१८ ऑगस्ट

सोयगाव तालुक्यातील रुद्रेश्वर लेणी येथे पर्यटनासाठी व श्रावण सोमवार निमित्ताने आलेल्या सिल्लोड तालुक्यातील सात पर्यटक ओमनी गाडी सह वाडी नदीच्या पुरात अडकल्याची घटना वेताळवाडीच्या नदी मध्ये दुपारी दोन ते तीन वाजेच्या दरम्यान घडली.या पर्यटकांना ग्रामस्थांनी पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यासाठी तत्परता दाखवून ही रेस्कु मोहीम यशस्वी केली आहे. दरम्यान पुरातन बाहेर काढलेल्या सात प्रवाशी सुखरूप होते.



सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव येथील सात प्रवाशी ओमनी गाडीने ओमनी गाडी क्र-एम.एच-२०,ए.जी-७३२९ आले दुपारी रुद्रेश्वर लेणी पाहून हे पर्यटक परतत असताना या भागात झालेल्या रिपरिपीच्या संततधार पावसाने वेताळवाडीच्या नदीला मोठा पूर आला होता चालकाने गाडी नदीत घातली तेव्हा पुराचा प्रवाह कमी होता,परंतु ओमनी वाहन नदीच्या पात्रात मध्यभागी असताना अचानक पुराच्या पाण्याचा प्रवाह वाढला.यावेळी चालक शेख रफिक शेख हे थोडावेळ गंगारले परंतु हा प्रकार नदी च्या जवळ असलेले वाडी गावचे पोलीस पाटील श्रीराम जाधव यांच्या लक्षात येताच त्यांनी गावातील इसाक शहा,आयुब शहा,आरिफ खान,माजित खॉ मेवाती,गुफरान पठाण, वेताळवाडी गावचे पोलीस पाटील श्रीराम जाधव,कालू हुसेन मेवती यांचेसह दहा ते बारा पोहणाऱ्या मुलांनी पुराच्या पाण्यात नदी पात्रात उड्या टाकून त्यांनी वाहन पकडून धरत पाण्यातून ओमनी वाहन ढकलत नदीच्या किनाऱ्यावर आणून त्यातील तीन पुरुष व चार महिलांना सुखरूप बाहेर काढून ट्रॅक्टरच्या साहाय्याने ट्रॅक्टर मालक सत्तार खान मेवाती यांनी पुरातील अडकलेले ओमनी वाहन पाण्याच्या बाहेर काढले. व दरम्यान पुरात अडकलेल्या सुखरूप बाहेर काढलेल्या प्रवाशांना तातडीने शाबीर मिस्तरी यांच्या गाडीने दुसऱ्या वाहनाने उंडनगाव येथे पोहचविण्यात आले.

दरम्यान वेताळवाडी नदीच्या पात्रावर अद्यापही पूल उभारण्यात आलेला नाही या नदीच्या पात्रातून पर्यटक नदीतून रुद्रेश्वर लेणी गणेश मंदिर परिसर व इतर पर्यटन साठी जातात त्यामुळे या नदी वर तातडीने पूल मंजूर करण्यात यावा अशी मागणी वाडी गावाचे पोलीस पाटील श्रीराम जाधव यांच्या सह ग्रामस्थांनी केली आहे.

# कन्नड नगरपरिषदेत नव्या प्रभाग रचनेची घोषणा : १२ प्रभागांतून होणार निवडणूक

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.१८ ऑगस्ट – कन्नड नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. नव्या रचनेनुसार शहरात एकूण १२ प्रभाग असतील. यामध्ये ११ प्रभाग द्विसदस्यीय तर १२ वा प्रभाग त्रिसदस्यीय ठेवण्यात आला आहे.

या प्रारूप रचनेवर हरकती व सूचना नोंदविण्यासाठी नागरिकांना ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली असून, अधिसूचना नगरपरिषदेचे मुख्याधिकारी ऋषीकेश भालेराव यांनी जारी केली आहे. यामुळे कन्नड शहरात यापूर्वीच्या ११ प्रभागांऐवजी आता एक प्रभाग वाढून १२ प्रभाग झाले असून, नगरसेवकांची संख्या दोनने वाढणार आहे.

गत नगराध्यक्ष व नगरसेवकांचा कार्यकाळ डिसेंबर २०२१ मध्ये संपुष्टात आला होता. आता नव्या रचनेनुसार प्रभाग १ ते ११ द्विसदस्यीय तर प्रभाग १२ त्रिसदस्यीय आहे.

प्रभागवार रचना, सदस्यसंख्या व लोकसंख्या

प्रभाग १ (द्विसदस्यीय) – शांतीनगर, चंद्रलोकनगरी, गुरुदत्त कॉलनी, शरद पवार कॉलनी, समरसता कॉलनी, दत्त कॉलनी, अनुराधा पार्क – लोकसंख्या : ३,३४६, प्रभाग २ (द्विसदस्यीय) – म्हाडा कॉलनी, जवाहर कॉलनी, भोलेश्वर कॉलनी, श्रीराम कॉलनी, प्रगती कॉलनी – लोकसंख्या : ३,१८७, प्रभाग ३ (द्विसदस्यीय) – गजानन कॉलनी, संभाजी कॉलनी, नवजीवन कॉलनी, सिद्धार्थ कॉलनी, सिंचन नगरी – लोकसंख्या : ३,००१, प्रभाग ४ (द्विसदस्यीय) – शिवनगर, गोरोबानगर – लोकसंख्या : ३,०००, प्रभाग ५ (द्विसदस्यीय) – खांडसरी परिसर, पोलीस कॉलनी, प्राध्यापक कॉलनी, सावित्रीबाई फुले कन्या शाळा, हुकूमचंद नगर – लोकसंख्या : ३,२९२, प्रभाग ६ (द्विसदस्यीय) – आदर्श कॉलनी, विष्णूनगर, स्नेहनगर, छाजेड नगर – लोकसंख्या : ३,०९८, प्रभाग ७ (द्विसदस्यीय) – करीमनगर, सानिया नगर, वडार वाडा, रोहिदास नगर – लोकसंख्या : ३,९५२, प्रभाग ८ (द्विसदस्यीय) – समर्थनगर, टिळकनगर, साठेनगर, लष्कर – लोकसंख्या : ३,३३५, प्रभाग ९ (द्विसदस्यीय) – नितीन नगर, इर्शाद नगर, आयेशा नगर – लोकसंख्या : ३,२२८,प्रभाग १० (द्विसदस्यीय) – बाजारपेठ, भिल्ल पलटण, शिवाजीनगर – लोकसंख्या : ३,१९८, प्रभाग ११ (द्विसदस्यीय) – उरुस मैदान, पांढरी मोहल्ला – लोकसंख्या : ३,४७०, प्रभाग १२ (त्रिसदस्यीय) – आठवडी बाजार, माळीवाडा – लोकसंख्या : ५,०३७.

# कन्नड तालुक्यात ७९ वा स्वातंत्र्य दिन – देशभक्ती, संस्कृती आणि सामाजिक संदेशाचा संगम







कन्नड :- दि.१७ ऑगस्ट -कन्नड तालुक्यात शाळा, संस्था आणि कार्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला यात वृक्षलागवड, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कार्यशाळेतून स्वातंत्र्य साजरा करण्यात आला आहे

करंजखेड महावितरण शाखेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

१५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त करंजखेड महावितरण शाखा कार्यालयात आपण निसर्गाचे देणे लागतो या संकल्पनेतून वृक्षारोपण करण्यात आले. केशर, दशरी आणि फोनासा या आंब्याच्या जातींची लागवड करण्यात आली. कनिष्ठ अभियंता हिवर्डे यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी झाडांचे पालकत्व स्वीकारून पर्यावरण जपण्याची शपथ घेतली.

रविंद्रनाथ टागोर प्राथमिक विद्यालयात सांस्कृतिक बहार

कनकावतीनगर येथील रविंद्रनाथ टागोर प्राथमिक विद्यालयात मुख्याध्यापक रविंद्र निळ यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात कब बुलबुल पथकाची मानवंदना, सामूहिक कवायत, देशभक्तिपर गीत, नृत्य व भाषण सादर झाले.

शालेय मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. पाहुण्यांनी देशभक्ती, प्रामाणिकपणा आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर विद्यालयातील शिस्तीची प्रशंसा केली. कार्यक्रमासाठी शिक्षक व पालक प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले. कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात पारंपरिक व देशभक्तीपर कार्यक्रम

या विद्यालयात ध्वजारोहणानंतर महाराष्ट्र स्काऊट गाईड पथकाने मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी लेझीम, साडी कवायत आणि देशभक्तिपर गीतांच्या सादरीकरणाने उपस्थितांचे मन जिंकले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांनी संस्थेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करत पायाभूत सुविधांसाठी मदतीचे आश्वासन दिले.

जयकाली कॉम्प्युटरमध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

कन्नड शहरातील जयकाली सांस्कृतिक मंडळाच्या पुढाकाराने 'घरघर तिरंगा – हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित झाली. मार्गदर्शन करताना वक्त्यांनी लोकशाहीतील मतदानाचा व विचार मांडण्याचा अधिकार याबाबत प्रेरणादायी विचार मांडले. अनेक विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

कन्नड तालुक्यातील विविध कार्यक्रमांतून स्वातंत्र्य दिन हा केवळ औपचारिक सोहळा न राहता, तो पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक जतन आणि राष्ट्रीय मूल्यांच्या दृढीकरणाचा प्रभावी मंच ठरला

# स्वातंत्र्य दिनानिमित्त मार्शल आर्ट्स कुंग फु कराटे मधील मार्शल आर्ट्स अकॅडमीचे १२५ विद्यार्थी उत्तीर्ण ४० विद्यार्थीना केले सन्मानित

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १८ ऑगस्ट : स्वातंत्र्य दिनानिमित्त मार्शल आर्ट्स कुंग फु कराटे मधील मिशन मार्शल आर्ट्स अकॅडमीचे १२५ विद्यार्थी उत्तीर्ण.४० विद्यार्थ्यांना उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन दि १५ ऑगस्ट रोजी मिशन मार्शल आर्ट्स अँड वुशु कुंग- फु स्पोर्ट्स कराटे असोसिएशन (इंडिया) छत्रपती संभाजीनगर संघटनेने केले होते.प्रमुख पाहुणे . दत्ता भांगे अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ )सचिन क्षीरसागर (विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ छत्रपती संभाजी नगर )मिशन मार्शल आर्ट्स अकॅडमी चे संस्थापक अध्यक्ष मास्टर पवन घुगे, सचिव व मुख्य कराटे प्रशिक्षक प्रविन घुगे,मनोज




पेरे ,अजय घुगे आदित्यनाथ बारगजे सुर्दशन वाघमारे (स नि. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ) पंकज यादव श्रीधर मस्के ( उद्योजक ) कापकर , विजय आघाव, पाथरकर सिस्टर जिना चॉको ( मुख्याध्यापिका डीव्हाईन चाइल्ड स्कूल, बिडकीन) फिलोमीना सिस्टर (डीव्हाईन चाइल्ड स्कूल, बिडकीन) करडी प्रशिक्षिका राधा घुगे, नंदा घुगे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ग्रेड बेल्ट व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.ग्रेड येल्लो बेल्ट मुली :- कु.आराध्या ठाकूर, इशिता पवार,नीरा डोनगावकर, प्रिशा राठोड, अस्मिता राजूरकर,प्रांजल गायकवाड ,अलिषा यादव,स्वरांजली भवर, शैलाजा मुगावकर, वेदा अस्तोरकर, श्लोका चव्हाण, ईश्वरी मुंढे, विधानी मिश्राम.

ग्रेड एलो बेल्ट मुले :- विराज आघाव, अर्जुन ठाकूर, तिशान चव्हाण, राजवीर वानखडे, वेद कावसानकर, सत्वन गायकवाड,अद्विक मुंढे,ऋत्विक मुंढे.

ग्रेड ऑरेंज बेल्ट मुली :- कु. जिया श्रीवास्तव,श्रुती हिंगे,श्रावणी मोठेवार,वृद्धा कुलकर्णी,नव्या जाधव आरोही नरवडे,सानिका पागोरे, सनदी क्षीरसागर, प्रचिता सरोदे,काव्या पागे,सायनिका मंडल.ग्रेड ऑरेंज बेल्ट मुले:- कौस्तुभ कटके, साई मोरे, कार्तिक पोडगे,सिद्धांत त्रिभुवन,दर्शिल पागे,शिवराज ढोकणे, आयुष नरोडे विशाल कावळे, श्रेयश मैत्रे, चिन्मय भालेकर, समर्थ रणधवे, अगस्त्या अबोटी.ग्रेड ग्रीन बेल्ट मुली :- कु. प्रांजली यादव, रुचिका मिस्त्री, मोक्षदा पाटील अक्षदा भवर, त्रिशा अन्वी मदरपल्ली, ऐश्वर्या चौधरी,ज्ञानेश्वरी भवर, मुद्रा टार्पे,प्रिशा पदमवार. ग्रेड ग्रीन बेल्ट मुले :- शर्विल यादव, अगस्त्या मामिडीसेटी, श्रीजीत उडान, व्यंकटेश पेन्सिलवार, वेदांत गुंजल पर्व टार्पे, अभिराज देशमुख, वर्धन आचलिया.ग्रेड ब्लू बेल्ट मुली :- कु.सान्वी साखळकर, कोमल फतपुरे , निर्झा लांडे,आनंदी लांडे,गार्गी पांचाळ.ग्रेड ब्ल्यू बेल्ट मुले:- शिवम फतपुरे,तेजस राक्षे, कैवल्य पांचाळ,आदित्य गजभिव.ग्रेड प्रपल बेल्ट मुली :-कु. समिका काळे,सोनिका जैन, जोहा सय्यद, ओजस्वी करांडे, तनुश्री राठोड, नक्शा नेहेते,देवांशी भांजा, शार्वी करमाळकर.ग्रेड पर्पल बेल्ट मुले :- अनुज मिस्त्री जय राठोड.ग्रेड ब्राऊन बेल्ट १ प्रथम,२द्वितीय, ३तृतीय ४ चतुर्थ मुली :- कु. ओवी पाटील, धनश्री सिदवाडकर, सायली गोरे,अनुष्का डोईजड, गौरी घुगे, ओजस्वी बारगजे, नव्या दरगड, श्राव्या यावले,अनुश्री तरटे, सृष्टी ढाकणे, अर्णवी जंगले, राजेश्वरी मेढे,प्राची घोरपडे, रुजूला वडगावकर, दिव्या वडगावकर.मुले :- स्वरूप बनकर, मयूर चव्हाण, अथर्व त्रिपाठी, वीरेंद्र राठोड,वैजनाथ पांचाळ, ऋत्विक जोशी,देवाशी दत्ता.

# शेवटच्या चौथ्या सोमवारी घृष्णेश्वर, दर्शनासाठी भाविकांची गर्दी

खुलताबाद प्रतिनिधी शिवभक्तांसाठी पवित्र असलेल्या श्रावण महिन्याच्या चवथ्या सोमवारी देखील पहाटे तीन वाजेपासून रात्री उशिरा पर्यंत भाविकांनि श्री घृष्णेश्वर, दर्शनासाठी गर्दी केली होती. ओम नमः शिवाय,हर हर महादेवच्या गजरात भाविकांनी रांगेत उभे राहून दर्शन घेतले.



शेवटच्या सोमवारी शहरातून खेड्या पाड्यातून मोठ्या संखेने भाविक वेरूळ येथे दर्शनासाठी आले होते. शेवटचा श्रावन सोमवार असल्याने वेरूळ भाविकांच्या गर्दीने परिसर फुलून गेला,मंदिर परिसरात काही शिवभक्तांच्या वतीने भाविकांसाठी फराळ, पाण्याची व्यवस्था करण्यात आली. आलेल्या भाविकांनी मंदिर परिसरात दत्ताजी भाले यांच्या रक्तपेढीत रक्तदान केले.

तर श्रावण महिन्याच्या दृष्टीने भाविकांची संख्या लक्षात घेता महिनाभर बॅरिकेट्स लावण्यात आले होते. रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या दुपार नंतर गर्दीत वाढ झाली होती. यावेळी श्री घृष्णेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष कुणाल दांडगे,विश्वस्त योगेश टोपरे, मिलिंद शेवाळे,राजेंद्र कौशिके,संजय वैद्य, रवींद्र पुराणीक, रेखाताई ठाकरे, व्यवस्थापक संजय जोशी सह मंदिर समिति विश्वस्त आणि पुजारी यांच्यावतीने व्यवस्थित व्यवस्थापन करण्यात आले होते कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्तत ठेवण्यात आला होता.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ४०६/२०२५
पुढील तारीख : २९/९/२०२५

अर्जदार : १. तुळशिराम कोडाजी ढंगारे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २. कमलबाई भ्र. पंढरीनाथ देवकर, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोली (नकीब) ता. फुलंब्री, जिल्हा छ. संभाजीनगर ३-अंकुश पिता तुळशिराम ढंगारे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. मु.पो. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४. शाम पिता तुळशिराम ढंगारे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. मु.पो. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

– विरुध्द –

गैरअर्जदार –निरंक

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत...

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी. डी. जोशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ची पत्नी व अर्जदार २ ते ४ ची आई नामे कौसाबाई तुळशिराम ढंगारे ही दिनांक ५.६.२०२५ रोजी छ. संभाजीनगर । औरंगाबाद, येथे मयत झालेली आहे, व त्यांचा अंत्य संस्कार नागापुर ता. कन्नड येथे झालेला आहे. सोबत महानगर पालिका छ. संभाजीनगर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक ०१.०८.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार सोबत स्वतःचे आधार कार्ड विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक १३/०८/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले,

दिनांक : १३/०८/२०२५

आदेशावरुन

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क.५६०/२०२५

अर्जदार : १) कडुबाई जगन्नाथ गावंडे, वय ४५ वर्षे, धंदा शेती रा. देवकरवाडी, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) केशव पि.जगन्नाथ गावंडे वय १६ वर्षे धंदा शिक्षण अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क. १ ३) गोविंद पि. जगन्नाथ गावंडे वय १३ वर्षे धंदा शिक्षण अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क्र.१ ४) हरीष पि. जगन्नाथ गावंडे वय ११ वर्षे धंदा शिक्षण अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क्र.१ ५) लता भ्र. संपत मोरे, वय ५४ वर्षे धंदा शेती, रा. पुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) सुनंदाबाई रमेश शेवाळे, वय ५२ वर्षे धंदा शेती, रा. शंकरपुर पो. सावखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) गंगुबाई भ्र. वाल्मिक कापसे, वय ५० वर्षे धंदा शेती, रा. पोटुळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) पुष्पा जगन्नाथ गावंडे, वय ४४ वर्षे धंदा शेती रा. देवकरवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ९) सविता उर्फ सरला भ्र. अर्जुन नेमाने, वय ४१ वषे धंदा शेती रा. शिरेसायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, जगनाथ धोंडीराम गावंडे हे मौजे देवकरवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते त्यांचा विवाह पदमाबाई जगन्नाथ गावंडे यांच्यासोबत झाला होता व त्यांच्या वैवाहिक संबंधातुन अर्जदार क्र.५ ते ९ यांचा जन्म झालेला आहे. तसेच जगन्नाथ धोंडीराम गावंडे यांनी अर्जदार क्र.१ यांच्यासोबत दुसरा विवाह केलेला असुन जगन्नाथ धोंडीराम व अर्जदार क्र.१ यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार क्र.२ ते ४ यांचा जन्म झालेला आहे. जगन्नाथ धोंडीराम गावंडे हे दिनांक १२/१२/२०१७ रोजी मौजे देवकरवाडी ता. गंगापुर येथे मयत झालेले असुन पदमाबाई जगन्नाथ गावंडे या दिनांक १५/०४/२०२० रोजी मयत झालेल्या आहे. मयत जगन्नाथ धोंडीराम गावंडे यांना अर्जदार क्र.१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले व अर्जदार क्र.५ ते ९ या मुली असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

सदर प्रकरणात पुढील तारीख दि.२४/०९/२०२५ रोजीची ठेवण्यात आली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्कयानी आज दिनांक १८/८/२०२५ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर

## अग्रलेख...

# आता घुसखोरांची गय नाही

गेल्या जून महिन्यात बलाढ्य समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतील रस्त्यांवर जळलेल्या वाहनांचा खच पडला होता. न्यू यॉर्क, लॉस एन्जेलिस, कॅलिफोर्नियामध्ये निर्वासितांनी धुमाकूळ घातला होता. अमेरिकेतील निर्वासितांच्या संदर्भात डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी निर्वासितांनी अमेरिकेला वेठीस धरले होते. बेकायदेशीर निर्वासितांचा हा प्रश्न आता अमेरिकेसह संपूर्ण युरोपला भेडसावत आहे. यातील बहुतांश निर्वासित हे अवैध मार्गाने शिरलेले घुसखोर आहेत. अमेरिका, युरोपप्रमाणे भारतही गेल्या ५० वर्षांपासून घुसखोरीचा सामना करीत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपली लोकसंख्या होती केवळ ३५ कोटींच्या आसपास. आजचा आकडा आहे १४५ कोटी ६० लाख. म्हणजे आपल्याकडे असलेली नैसर्गिक संसाधने तेवढीच. पण खाणारी तोंडे बेसुमार वाढली. स्वातंत्र्यानंतर गेल्या ७८ वर्षांमध्ये लोकसंख्येत सुमारे ११० कोटींनी वाढ झाली. या लोकसंख्येत घुसखोरांचा आकडा मोठा आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ५४ कोटी ८० लाखांच्या आसपास होती. पुढच्या दहा वर्षांत १९८१ ला हा आकडा ६८ कोटी ५१ लाख एवढा झाला. अर्थात दहा वर्षांमध्ये लोकसंख्येत १४ कोटींनी वाढ झाली. १९७१ मध्ये बांगलादेशची निर्मिती झाली. या निर्मिती प्रक्रियेत भारताचा हात असल्याचे गोडवे गायिले जात असले तरी याचा सर्वांत मोठा फटका आपल्यालाच बसला आणि अजूनही बसतो आहे. पाकिस्तानचा लष्करी हुकूमशहा जनरल याह्या खान यांच्या सैन्याने बंगाली नागरिकांवर अनन्वित अत्याचार केल्याने लक्षावधी बंगाली भारताच्या दिशेने पळत सुटले. आपणही मोठ्या उदार मनाने या बांगलादेशींना आश्रय दिला. त्याचा परिणाम असा झाला की आज आसाममधील एकूण ३५ पैकी ११ जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत. १९७१ मध्ये बांगलादेशी घुसखोर या भागात घुसले आणि त्यांनी स्थानिकांच्या जमिनी बळकावत, वनक्षेत्रावर ताबा मिळवित आपले प्रभुत्व निर्माण केले. याच जिल्ह्यांमधून लाखोंच्या संख्येने घुसखोर उर्वरित भारतात घुसत आहेत. पश्चिम बंगालचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही. बांगलादेशला लागून असलेल्या मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर हे जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत तर बिरभू, दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यांमधील मुस्लिमांची संख्या ३० टक्क्यांच्या वर आहे. आणि पाच जिल्हे असे आहेत की तेथे मुस्लिमांचे प्रमाण २५ टक्क्यांच्या वर आहे. ही आकडेवारी दहा वर्षांपूर्वीची आहे. कदाचित आसाम आणि पश्चिम बंगालमधील आणखी काही जिल्ह्यांमध्ये हिंदू अल्पसंख्यक झाले असतील. झारखंड आणि बिहारमध्येही मुस्लिमांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे मुस्लिमांच्या वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणले नाही तर झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल ही राज्ये हिंदूंच्या हातून गेलेच समजा. असे झाले तर बांगलादेशसह या तीन राज्यांचा एक मोठा समूह मुस्लिमबहुल होऊन आणखी एका फाळणीच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्यास नवल वाटायला नको. एका अंदाजानुसार भारतात सध्या तीन कोटींपेक्षा जास्त घुसखोर वास्तव्यास आहेत. घुसखोरीच्या समस्येकडे काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने कमालीचे दुर्लक्ष केले आहे. नव्हे अवैध घुसखोरीला प्रोत्साहन दिले. केवळ मुस्लिम मते मिळवून त्यांच्या बळावर सत्ता संपादन करण्यासाठी काँग्रेससह डावे पक्ष आणि सपा, तृणमूल काँग्रेस, राजद, डीएमके, राष्ट्रवादी काँग्रेस (एकत्रित) आदी प्रादेशिक पक्षांनी मुस्लिमांना कुरवाळण्याचे धोरण स्वीकारून देशासमोर फार मोठे आव्हान उभे केले आहे. देशासमोर येणाऱ्या दोन दशकांनंतर लोकसंख्येच्या प्रमाणात होणाऱ्या बदलामुळे कोणते संकट उभे ठाकेल याची जाणीव झाल्याने लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांचा घुसखोरीचा मुद्दा उपस्थित केला. देशातील लोकसंख्येचे प्रमाण हेतुपुरस्सर बदलले जात असून याचा देशावर विपरीत परिणाम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या आव्हानाला तोंड देण्यासाठी उच्चस्तरीय लोकसंख्याशास्त्रीय मिशनची त्यांनी घोषणा केली. आतापर्यंत कोणत्याही पंतप्रधानाने घुसखोरीच्या मुद्याला लाल किल्ल्यावरून संबोधित करताना हात घातला नव्हता. घुसखोरी राष्ट्रासमोरील मोठे आव्हान आहे. देशाच्या सीमावर्ती भागात बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांना वसविल्यानंतर स्थानिकांच्या जमिनी लाटून अथवा शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून बस्तान बसविण्याचे षडयंत्र रचले जात आहे. २००४ ते २०१३ या काळात उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालच्या सीमेवर मशिदी आणि मदरशांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्या राज्यातील सीमेवरील धार्मिकस्थळे हटविण्याची धडक मोहीम सुरू केली असली तरी बिहारातील राजकीय अपरिहार्यतेमुळे घुसखोरीच्या मुद्याला हात घातला गेला नाही. पश्चिम बंगालमध्ये तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी घुसखोरांचे समर्थक आहेत. अवैध घुसखोरीसाठी केंद्र सरकार जबाबदार असल्याचे सांगत कारवाई करण्यास नकार देतात. संपूर्ण भारतात घुसलेल्या बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांना बनावट आधार, पासपोर्ट, वाहन परवाना, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र तयार करून देण्याचे काम पश्चिम बंगालमधूनच केले जाते.

वर्षभरापूर्वी झारखंडमध्ये झालेली विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाने घुसखोरीच्या मुद्यावरच लढविली होती. संथालसह अन्य आदिवासी भागातील भोळ्याभाबड्या आदिवासींना फसवून त्यांच्या जमिनी बळकावण्याचे कारस्थान जोरात सुरू आहे. एवढेच नव्हे तर आदिवासी मुलींशी विवाह करून त्यांचे धर्मपरिवर्तन करण्याचे कुटिल कारस्थान रचले गेले आणि त्याला गोरगरीब आदिवासी बळी पडत आहेत. दुर्दैवाने भारतीय जनता पक्षाने उपस्थित केलेला घुसखोरीचा आणि आदिवासींच्या फसवणुकीचा मुद्दा मतदारांच्या गळी उतरला नाही. युद्ध करून भारतावर कब्जा करणे शक्य नसल्याचे परकीय आक्रमकांना समजले होते. त्यामुळे त्यांनी हिंदूंना बाटवा, नासवा आणि नष्ट करा या त्रिसूत्रीचा अवलंब करून भारतावर शेकडो वर्षे राज्य केले. विशेष म्हणजे जो भाग मागासलेला आहे त्या भागावरच मुस्लिम आणि ख्रिस्ती धर्मप्रचारक लक्ष केंद्रित करतात. ईशान्य भारतातील मणिपूर वगळता इतर राज्यांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात धर्मपरिवर्तन केले जात आहे. ख्रिस्ती धर्मप्रचारक आदिवासींना तर जिहादी दलितांना लक्ष्य करीत आहेत. काँग्रेसची सत्ता असताना देवभूमी उत्तराखंडमध्ये लोकसंख्येची रचना बदलण्यासाठी लॅण्ड जिहाद पुकारण्यात आले. वनविभागाच्या जमिनीवर कबरी, मजारी उभारत जागा ताब्यात घेण्याचे भयंकर षडयंत्र आखण्यात आले होते. पण, भाजपाचे सरकार आल्यानंतर अवैध मजारी हटविण्यात आल्या. काँग्रेसची सत्ता असल्यास प्रशासनाकडून हमखास सहकार्य मिळेल, याची खात्री असल्याने जिहादींची हिंमत वाढली होती. ज्या राज्यांमध्ये भाजपाची सरकारे आहेत तेथे आता लॅण्ड जिहादला काही प्रमाणात आळा बसलेला आहे. स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करून जिहादींना इशारा दिला आहे. घुसखोरी रोखण्यात पश्चिम बंगाल सरकारचा मोठा अडथळा आहे. राज्य सरकार सहकार्य करीत नसल्याने बांगलादेशी घुसखोर बिनदिक्कत सीमा ओलांडून भारतात प्रवेश करीत आहेत. सनातन धर्माचे अस्तित्व कायम ठेवायचे असेल तर संस्कृतीवर होणारे आक्रमण थांबविणे आणि घुसखोरांची हकालपट्टी करणे हाच एक उपाय आहे. येणाऱ्या काळात मोदी सरकार ऑपरेशन 'पुश बॅक' आणखी तीव्र करण्याची शक्यता आहे. बिहारातील मतदारयादी पुनरीक्षण हा यातील पहिला टप्पा आहे. पुढील टार्गेट हे पश्चिम बंगाल असेल यात शंकाच नाही. त्यामुळेच राजकीय उद्देशाने मुस्लिमांची तळी उचलून धरणाऱ्यांचे धाबे दणाणले असून मतदारयादी पुनरीक्षणाला जोरदार विरोध सुरू केला आहे. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी सुरू केलेली मतदार अधिकार यात्रा म्हणजे त्यांच्या पायाखालची वाळू सरकण्यासारखे आहे. कारण, घुसखोरी कायमस्वरूपी रोखण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये सत्तापरिवर्तन आवश्यक झाले आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# हत्तींचा कळप आणि पक्ष्यांचा थवा!

फिल्ड मार्शल मुनीर हे कुराणचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांना संपूर्ण कुराण कंठस्थ आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडात त्यांचे एक भाषण झाले. या भाषणाचा प्रारंभच त्यांनी कुराणमधील एका गोष्टीने केला.

इब्राहिमने मक्का-काबा शहर बांधले. या शहराची भरभराट होऊ लागली. व्यापार वाढू लागला, प्रगती होऊ लागली. येमेन व इथोपियाचा राजा अब्राहाच्या डोळ्यात ही बाब खुपू लागली. त्याने आपल्या राज्यातील साना गावात एक चर्च बांधले. याने संतप्त होत एका मुस्लिमाने सानात जाऊन या चर्चवर लघवी केली. राजा अब्राहा संतापला. त्याने काबा-मक्काला कायमचे संपविण्याचा निर्णय घेतला व आपले लष्कर काबाच्या दिशेने पाठविले. त्यात मोठमोठे हत्ती होते. काबाचा विनाश होणार होता. पण, अल्लाहने काबाच्या रक्षणाचे वचन दिले होते.

**गोष्ट महमूदची :** काबाला संपविण्यासाठी पाठविलेल्या हत्तींमध्ये मेहमूद नावाचा हत्ती होता. त्याचा माहूत त्याला काबाकडे कूच करण्यास सांगत होता आणि हा हत्ती वारंवार जमिनीवर बसून जात असे. अल्लाहने या हत्तींच्या विरोधात पक्ष्यांचे थवे पाठविले आणि या पक्ष्यांनी मातीचे लहान लहान दगड या हत्तींवर टाकणे सुरू केले.

**हत्तींची काय गत झाली? :** भारताने आम्हाला संपविण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही अशीच गत भारताची करू, असा इशारा देण्यास मुनीर विसरले नाहीत. अरबस्तानात ज्या वर्षात ही घटना घडली त्याला अम अल फिल म्हणजे हत्तीचे वर्ष म्हटले जाते आणि या घटनेनंतर ५० वर्षांनी मुस्लिम प्रेषित मोहम्मद पैगंबराचा जन्म झाला.

**मर्सिडिस आणि गिट्टीचा ट्रक :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारताच्या विरोधात किती आग ओकावी? भारत म्हणजे चकाकनारी मर्सिडिस आणि पाकिस्तान म्हणजे रेती-गिट्टीने भरलेला ट्रक! अशा ट्रकने मर्सिडिसला धडक दिली तर चकाकणाऱ्या मर्सिडिसचे काय होईल? असा प्रश्न विचारीत मुनीर यांनी पुन्हा एकदा भारताला धमकी दिली. विशेष म्हणजे ही धमकी अमेरिकेच्या भूमीवरून देण्यात आली.

**पहलगामपूर्वी :** पहलगाम हत्याकांड होण्यापूर्वी जनरल मुनीर यांनी अशीच भारताविरोधात गरळ ओकली होती. फिल्ड मार्शल मुनीर यांच्या चिथावणीखोर भाषणानंतर भारतासमोर एकच पर्याय आहे तो म्हणजे पाकिस्तानचे चार तुकडे करणे. १९७१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे दोन तुकडे करीत ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांना शरणागतीसाठी बाध्य केले होते. जगाच्या इतिहासातील ही एक सर्वांत मोठी शरणागती मानली जाते. आता भारताला पाकिस्तानचे चार तुकडे करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**सिंदूरनंतर :** देशाचे वायुदलप्रमुख अमरप्रीत सिंग यांनी एका कार्यक्रमात बोलताना, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला अधिक चोप देण्याची आमची इच्छा होती असे म्हटले आहे. आता ती इच्छा पूर्ण करण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानला अन्य कोणतीही भाषा समजत नाही, त्याला एकच भाषा समजते ती म्हणजे युद्धाची. भारताला आता पाकिस्तानच्या विरोधात निर्णायक पावले उचलावी लागतील असे मानले जाते.

**फ्लोरिडातील भाषण :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी अमेरिकेच्या फ्लोरिडामधील हयात हॉटेलमधील एका समारंभात बोलताना जे शब्द उच्चारले आहेत त्याची गंभीर दखल भारताला घ्यावी लागेल. या कार्यक्रमाचा प्रारंभ कुराणच्या एका आयतचे पठन करून करण्यात आला. नंतर पाकिस्तानचे राष्ट्रगीत झाले आणि यानंतर फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारतावर जणू शब्दांचा बॉम्बवर्षाव सुरू केला. या समारंभासाठी पाकिस्तानी वंशाच्या काही प्रतिष्ठितांना निमंत्रित करण्यात आले होते. कुणालाही मोबाईल वा अन्य डीजिटल उपकरणे आत नेण्याची परवानगी नव्हती. एका अमेरिकन सेनापतीच्या निवृत्ती समारोहानिमित्त हा समारंभ आयोजिण्यात आला होता.

**धरण तर बांधा :** फिल्ड मार्शल मुनीर भारताविरोधात युद्ध पुकारल्यासारखे बोलले. २५ कोटी पाकिस्तानींचे पाणी बंद करण्यासाठी भारताने इंदस नदी करार रद्द केला आहे. आता त्यावर धरण बांधले जाणार आहे. भारताने धरण बांधावेच. 'हम दस मिसाईल से फारीग कर देंगे! हमें मिसाईल की कमी है?' असे म्हणत मुनीर म्हणाले, इंदस नदी ही काही भारताची मालमत्ता नाही. भारताने कालव्यांचे बांधकाम सुरू करावे आणि मग पाकिस्तान काय करतो ते पाहावे.

**अर्धे जग घेऊन बुडू :** पाकिस्तान एक आण्विक राष्ट्र आहे. आमचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न झाल्यास केवळ आम्ही बुडणार नाही हे भारताने लक्षात ठेवावे. आम्ही अर्धे जग घेऊन बुडू. तेवढी आमची आण्विक क्षमता आहे, असेही मुनीर यांनी या भाषणात सांगितले.

**श्रेय ट्रम्प यांनाच :** भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धबंदीचे श्रेय केवळ राष्ट्रपती ट्रम्प यांनाच आहे आणि म्हणूनच आम्ही शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी त्यांचे नाव सुचविले आहे असेही ट्रम्प यांनी घोषित केले. फिल्ड मार्शल मुनीर यांनी आपल्या भाषणात अनेकदा भारताची खिल्ली उडविली.

**पूर्व ते पश्चिम :** भारताच्या पूर्व भागात महत्त्वाची प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे युद्धाचा प्रारंभ पूर्वेपासून होत तो पश्चिमेकडे जाईल. मुनीर यांनी अप्रत्यक्षपणे गुजरातच्या जामनगरमधील रिलायन्स रिफायनरीचा उल्लेख केला. जगातील हा सर्वांत मोठा तेल शुद्धीकरण कारखाना असल्याचे मानले जाते. या कारखान्याचा विमाच ३ लाख कोटी रुपयांचा असल्याचे समजते. यावरून या कारखान्यात किती मोठी गुंतवणूक करण्यात आली असावी याचा अंदाज करता येईल.

**अतिरेक्यांची घुसखोरी सुरूच :** दरम्यान, काश्मीर खोऱ्यात सुरू असलेल्या चकमकी पाहता पाकिस्तानी अतिरेक्यांचे आगमन अद्याप सुरू असल्याचे दिसते. कुलगाममधील चकमकीत भारताचे दोन जवान हुतात्मा झाले. ही चकमक प्रदीर्घ काळ चालली. या साऱ्यावरून पाकिस्तानने ऑपरेशन सिंदूरपासून कोणताही धडा घेतलेला दिसत नाही. याचाच अर्थ भारताला पाकिस्तानबाबत अधिक प्रभावी कारवाई करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**पाक सरकारलाच इशारा :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी केवळ भारताविरोधात भूमिका घेतली असे नाही तर त्यांनी आपल्या सरकारलाही इशारा दिला आहे. युद्ध ही एक गंभीर बाब असल्याने ती केवळ लष्करी सेनापतींवर सोडून चालत नाही असे म्हटले जाते. युद्धाप्रमाणेच राजकारण ही एक गंभीर बाब असल्याने ती केवळ राजकीय नेतृत्वावर सोडून चालणार नाही असे म्हणत मुनीर यांनी आपल्याच सरकारला धमकीही दिली.

**नवी परिस्थिती :** फिल्ड मार्शल मुनीर यांच्या या भाषणाने पाकिस्तान व भारत दोन्ही देशांसमोर नवी परिस्थिती निर्माण झाली अहे. आता या फिल्ड मार्शलचे करावयाचे काय असा प्रश्न पाकिस्तान सरकारसमोर उपस्थित झाला आहे. कारण मुनीर यांना चीन-अमेरिका दोन्ही महासत्तांचा पाठिंबा आहे. मुनीर यांचा कार्यकाळ नोव्हेंबर महिन्यात संपत आहे. त्यांना मुदतवाढ न दिल्यास कोणत्याही दिवशी आपले सरकार उलथविण्याचा धोका पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना भेडसावणार आहे.

**नवा बोनस :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी बलुच लिबरेशन आर्मी या पाकिस्तानातील फुटीर गटाला दहशतवादी घोषित करून मुनीर यांना जणू बोनस घोषित केला आहे. पाकिस्तानचे शासन अल्ला, आर्मी व अमेरिका हे तिघे चालवितात असे म्हटले जात असे. ते पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

## वेध

अनिल फेकरीकर

# धरणांनाही मिळावे सेफ सिटीचे कवच!

महाभारतातील कथेत शूरवीर कर्ण याचे रक्षण व्हावे याकरिता सूर्याने त्याला जन्मत:च अंगावर अभेद्य कवच प्रदान केले होते. अशाच स्वरूपाचे कवच सावनेर शहराला सेफ सिटी प्रकल्पामुळे मिळाले आहे. यामुळे भविष्यात सावनेर शहर नागपूर जिल्ह्यातील सर्वांत सुरक्षित शहर म्हणून नावारूपास येईल. पण २ ते ३ लाख हेक्टर जमिनीचे सिंचन करणारे आणि उपराजधानीतील ५० लाख लोकांची तृष्णातृप्ती करणारे कामठी खैरी तसेच तोतलाडोह धरण असुरक्षित का? त्यांनाही आता काळानुसार सेफ सिटी प्रकल्पाचा एक भाग म्हणून कवच द्यायला हवे. तसे पाहता काळासोबत जो चालतो तोच स्पर्धेत टिकतो. अन्यथा त्याला कालबाह्य म्हणून बाजूला सारले जाते. महाराष्ट्र पोलिसांनी या गोष्टीची चाहूल समजून तत्काळ काही बदल करणे सुरू केले आहेत. याच बदलातील एक बदल म्हणजे नागपूर जिल्ह्यातील सावनेर शहरात सुरू झालेला सेफ सिटी प्रकल्प होय. ७९ व्या स्वातंत्र्य दिनापासून हा सेफ सिटी प्रकल्प सावनेर शहरात कार्यान्वित झाला. या सेफ सिटी प्रकल्पामुळे सावनेर शहर सुरक्षित झाले आहे, असे म्हणावे लागेल. कारण यातील तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून लावण्यात आलेले कॅमेरे लहान मुलांचे खेळणे नाही. तर एखाद्या गुन्हेगाराच्या वाहनाने सावनेर शहरात प्रवेश करताच त्याचा क्रमांक टिपून काही क्षणात जन्मकुंडली देणारे तंत्रज्ञानाने युक्त आहेत.



सावनेरमध्ये एकूण २५ ठिकाणी ९३ एआय तंत्रज्ञानयुक्त आधुनिक कॅमेरे बसविले आहेत. यात फेशिअल रिकगयाझेशन सिस्टिम आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकगनायझेशन (एएनपीआर) ही व्यवस्था कार्यान्वित केली आहे. यात सुमारे १ लाखांपेक्षा जास्त गुन्हेगारांचा डाटा टाकण्याची सुविधा आहे. याकरिता १२८ टेराबाईट्स स्टोरेज क्षमताही देण्यात आली आहे. मध्यप्रदेशसह महाराष्ट्रातील गुन्हेगारांची छायाचित्रे या सिस्टिममध्ये टाकण्यात आली आहेत. जेणेकरून कुठलाही गुन्हेगार सावनेर शहरात आला तर त्याला घातपात करता येणार नाही, अशीच व्यवस्था पोलिसांनी करून ठेवली आहे. तसे पाहता पोलिसांचे हात लांब असतात. याचे ज्वलंत उदाहरण द्यायचे झाल्यास देवलापार पोलिस स्टेशन अंतर्गत एक अपघाताची घटना घडली होती. त्या घटनेत पती- पत्नी दुचाकीने जात असतात. वाटेत मोरफाटा भागात त्यांच्या वाहनाला अज्ञात ट्रकने धडक मारून तो आरोपी पळून गेला. या घटनेत महिलेचा जीव जातो. अशावेळी पीडित पती आपल्या पत्नीला उपचार मिळावा म्हणून भर पावसात जाणाऱ्या येणाऱ्यांना मदत मागतो. पण लोकांनी त्याला मदत केलीच नाही. अखेर हतबल पती आपल्या पत्नीचा मृतदेह दुचाकीला बांधतो अन् पुन्हा परतीच्या वाटेवर निघतो. वाटेत त्याने जो पत्नीचा मृतदेह लटकविला त्याचा व्हिडीओ तयार करून त्याला व्हायरल केले जाते. त्याचे दु:ख दूर करण्याऐवजी त्यावर मीठ चोळण्याचे काम केले जाते. त्याच प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी मार्वेल तंत्रज्ञानाचा वापर करून त्या धडक मारणाऱ्या आरोपी वाहनाचा शोध घेतला अन् विशेष म्हणजे आरोपीला उत्तर प्रदेशात जाऊन अटकही केली. याचा अर्थ पोलिसांनी मनावर घेतले तर पाताळातून आरोपीला आणू शकतात. हाच संदेश त्यांनी या प्रकरणातून दिला आहे, याकरिता त्यांचे आणि मार्वेल तंत्रज्ञानाचे अभिनंदन. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेल्या सावनेर तालुक्यात सतत तस्करी सुरू राहते. यावर आळा घालणे आवश्यक झाले आहे. त्या कारणाने पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची गरज सातत्याने भासत होती. ती गरज ओळखून त्यांनी सावनेर शहरात सेफ सिटी प्रकल्प कार्यान्वित करण्यावर भर दिला. हा प्रकल्प सुरू व्हावा याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी बरीच मेहनत घेतली. याबद्दल त्यांचे कौतुक करावेच लागेल. आता कळमेश्वर शहरातही सेफ सिटी प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. पण इतर शहरांच्या सुरक्षेचे काय? त्यांचाही विचार प्राधान्याने करावा. त्यापूर्वी धरणांचा विचार झाल्यास राष्ट्रीय संपत्ती सुरक्षित राहील. विशेषत: पारशिवनी तालुक्यातील पेंच प्रकल्प धरण (कामठी खैरी), रामटेक तालुक्यातील तोतलाडोह धरणाच्याही सुरक्षेचा विचार गृहमंत्रालयाने करायला हवा. केवळ शहरांना सुरक्षा देऊन काम होणार नाही. ही दोन्ही धरणे नागपूर शहरासाठी महत्त्वपूर्ण आहेत. यामुळे पुढील काळात या दोन्ही धरणांना सेफ सिटी प्रकल्पाच्या रूपात कवच मिळो, हीच अपेक्षा.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# सांस्कृतिक मार्क्सवादाचा हिंदू सणांवरील हल्ला

हिंदूंचा धर्म आणि त्यांचे तत्त्वज्ञान हे मार्क्सवादासमोर नेहमीच आव्हान राहिलेले आहे. हिंदूंचे सण आणि उत्सव, त्यांच्या परंपरा यांच्यावर प्रश्न उपस्थित करून, टीकाटिप्पणी करून सर्वसामान्य जनतेचा बुद्धिभेद करण्याचे काम सांस्कृतिक मार्क्सवाद करीत असतो.

हिंदूंचे आनंदाचे प्रसंग म्हणजे त्यांचे सण व उत्सव आहेत. या सर्व उत्सवांच्या माध्यमातून लोक एक होतात, आपल्या भावनांचे आदानप्रदान करतात, एकमेकांच्या आनंदामध्ये समरस होतात. यातून अर्थव्यवस्थेला सुद्धा खूप मोठी चालना मिळते. परंतु या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून कधी या सणांना पितृसत्ताक म्हणून हिणवायचे, तर कधी पर्यावरणविरोधी म्हणायचे, तर कधी कालबाह्य ठरवायचे असे यांचे प्रताप सुरू असतात. सध्याच्या धकाधकीच्या युगामध्ये अनेक घरांमध्ये आपले सण, उत्सव व त्यामागे दडलेला अर्थ सांगायला आजी-आजोबा नाहीत. शाळांमधून सुद्धा या मागचा खरा अर्थ मुलांना समजावून सांगण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे यातून निर्माण होणारी पिढी ही सांस्कृतिक मार्क्सवादाचे बळी ठरू शकते. या सांस्कृतिक मार्क्सवादाच्या हल्ल्यामुळे आमच्या नवीन पिढीचा आमच्या परंपरेवरचा विश्वास कमी होऊन ते श्रद्धाहीन होण्याचा धोका सुद्धा निर्माण होऊ शकतो. जे इस्लामी राजवटीला जमले नाही, इंग्रजांना जमले नाही ते या सांस्कृतिक मार्क्सवादामुळे होऊ शकते. म्हणून जनतेने सावध राहून वृत्तपत्र, समाज माध्यमे अशा सर्व ठिकाणी हिंदुस्थान आणि उत्सव यावर आक्षेप घेणाऱ्या लोकांचे आक्षेप खोडून काढणे आवश्यक आहे. कधी कधी हे मार्क्सवादी सिनेमातील नट आणि नटी यांना घेऊन सुद्धा त्यांच्या माध्यमातून हा हल्ला करतात. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला वाटते की एवढे मोठे लोक जर म्हणत आहेत तर कदाचित हे खरे असले पाहिजे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. हे सांस्कृतिक मार्क्सवादाचे हिंदू संस्कृतीवरील आक्रमण आहे हे आपण समाजाला पटवून दिले पाहिजे व आपले सण आणि उत्सव अतिशय धूमधडाक्यात व आनंदाने साजरे केले पाहिजेत.

आषाढ पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमेपासून सणांना सुरुवात होते. उन्हाळ्यात लग्न झालेल्या मुली आखाडीनिमित्त माहेरी येण्याचा प्रघात सुद्धा आहे. त्यानंतर जिवती हा सण येतो. पूर्वी सोनार लोक घरोघरी जाऊन दारावर जिवती लावायचे. पावसाळ्याची सुरुवात झालेली असते. पाणी प्रदूषित असते. यावेळेस घरातील मुलांचे आरोग्य चांगले राहावे या हेतूने या जिवती देवीची पूजा करण्यात येते. त्यानंतर नागपंचमी येते. फार पूर्वीपासून आपल्या पुराणांमध्ये वासुकी, शेषनाग इत्यादी नागांचे वर्णन आलेले आहे. आजही नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे कालसर्प पूजा करण्यात येते. पर्यावरण दृष्टिकोनातून बघितले तर हजारो टन अन्नधान्यांचा नाश करणाऱ्या उंदरांना खाणारे जे सर्प आहेत त्यांचेही स्मरण करण्याचा हा दिवस आहे. त्यानंतर रक्षाबंधन येते. बहीण आणि भावातील अकृत्रिम प्रेमाला दर्शविणारा हा सण आहे. यामध्ये बहीण भावाला राखी बांधते व भाऊ बहिणीच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेतो. इथे मात्र सांस्कृतिक मार्क्सवाद जागा होतो. तो म्हणतो की, हे पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. भावांनी बहिणींच्या रक्षणाची जबाबदारी कशाला घ्यायला पाहिजे? तुम्ही महिलांना कमजोर समजता का? इथे यांचा अभ्यास कमी पडतो. घरोघरी व्यक्तिगत स्तरावर जरी बहीण भावाला राखी बांधत असली तरीसुद्धा राक्षसराज बलीचे साम्राज्य उलथवून टाकण्याकरिता भगवान विष्णूच्या वामन अवतारामध्ये या वामन नावाच्या तरुण विद्यार्थ्याने गुरुकुलामध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे म्हणून रक्षा बांधली होती. १९०५ साली ज्यावेळेस इंग्रजांनी बंगालचे विभाजन केले त्यावेळेस सुद्धा समुद्रकिनाऱ्यावर जमलेल्या हजारो लोकांनी एकमेकांना रक्षासूत्र बांधून बंगालच्या विभाजनाच्या विरोधात लढण्याचा संकल्प केला होता. त्यामुळे रक्षा बांधणे हे एखाद्या कार्याचे किंवा संकल्पाचे स्मरण करून देण्याचे साधन आहे. राहिला प्रश्न भाऊ आणि बहीण यांच्यातील नात्यांचा. आई-वडील कोणालाही जन्मभराकरिता पुरलेले नसतात. त्यामुळे आपण गेल्यानंतर सुद्धा आपल्या मुलांमध्ये प्रेम आणि संबंध कायम राहावे यासाठी केलेली ही योजना आहे. आज नोकरीच्या निमित्ताने अथवा इतर कोणत्याही कारणांनी भाऊ-बहीण जर दूर राहत असतील तरीसुद्धा ते या दिवशी मनाने मात्र जवळ असतात व एकमेकांचे स्मरण करतात. ज्यांना भाऊ नाही किंवा बहीण नाही असे अनेक लोक कोणाला तरी बहीण किंवा भाऊ मानून त्यांच्याशी आपले अशा पद्धतीचे संबंध कायम ठेवतात. आज आपण अनेक ठिकाणी अनेक मंचावर स्त्रीवादी भूमिका मांडताना अनेकांना बघतो. समाजामध्ये स्त्री आणि पुरुष हे असले तरीही ते विविध नात्यांनी बांधले गेलेले असले पाहिजेत जेणेकरून यांच्यामध्ये संघर्ष न राहता परस्पर प्रेम कायम राहील हाही यामागचा उद्देश आहे. सांस्कृतिक मार्क्सवाद्यांना एवढे समजण्यासाठी भरपूर वेळ लागेल किंवा त्यांना समजून सुद्धा घ्यायचे नसेल. कारण त्यांचा उद्देश हिंदू संस्कृतीवर आक्रमण हाच आहे. ते कधी गणेशोत्सवामधील डीजेमुळे व्यथित होतात तर कधी गोविंदाच्या गाण्यांमुळे त्यांना त्रास होतो. होळीमध्ये आणि गोविंदामध्ये पाण्याचा अपव्यय केला जातो असे त्याचे म्हणणे असते. दिवाळीतल्या फटाक्यांमुळे वायुप्रदूषण होते हे सांगण्यासाठी विविध सिनेमातील कलाकारांना समोर आणून ते नागरिकांना फटाके न फोडण्याचे आवाहन करतात. परंतु हेच लोक कधीही ३१ डिसेंबरला फटाके फोडू नका असे आवाहन करीत नाही. जलीकट्टू किंवा बैलगाडा शर्यतीमध्ये प्राणी-हक्काचे उल्लंघन होते असे यांना वाटते परंतु बकरी ईदला लाखो बकरे कापले जातात त्यावेळेस यांच्यापैकी एकही समोर येऊन या प्राणी हिंसेबद्दल बोलत नाही. देवीला बोकड अर्पण करणे ही अंधश्रद्धा आहे याबद्दल अनेक साधुसंतांचा दाखला हे लोक देत असतात. परंतु इतर वेळेला बोकडाचे मटण खाल्लेले त्यांना चालते. 'दिवाळीच्या फटाक्यांमुळे गुदमरली मुंबई' अशा प्रकारचे मथळे छापणारे वृत्तपत्र ३१ डिसेंबरला मुंबई गुदमरली की नाही हे सांगत नाही.



सर्वच उत्सवांमध्ये समाजातील छोट्या छोट्या घटकांना काम मिळते. पोळ्याला मातीचे बैल बनविणारे कुंभार मग दिवाळीसाठी पणत्या बनवायला लागतात. फटाका उद्योगांमध्ये काम करणारे कामगार त्यांना तर वर्षातून एक वेळा फार मोठा रोजगार मिळतो. त्यामुळे ते वर्षभर त्यासाठी तयारी करतात. मूर्तिकारांना जन्माष्टमीला कान्होबा, गणेश जयंतीला गणपती, दुर्गा उत्सवामध्ये दुर्गा देवी, अशा विविध मूर्ती बनविण्याची संधी मिळते. भाजीपाला, किराणा, दूध, दही, मिठाई, खानपान सेवा, समारंभ व्यवस्थापन, नवीन दुचाकी, चारचाकी वाहनांची विक्री अशा अनेक गोष्टींना चालना मिळते. हिंदू सणांमुळे देशांमध्ये एक लाख कोटी रुपयांपेक्षा मोठी उलाढाल होते. अर्थव्यवस्थेला गती मिळते. सर्वसामान्य गोरगरीब जनतेपर्यंत पैसा पोहोचतो. त्यामुळे हिंदूंचे सण हे निसर्गाशी व आर्थिक चक्राशी संबंधित आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. हे सर्व समजून घ्यायला पुरोगामी, बुद्धिजीवी आणि मार्क्सवादी यांना वेळ नसला तरीही जनतेने मात्र अतिशय आनंदाने आणि उत्साहाने आपले सण साजरे केले पाहिजेत.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### सर्वसमावेशक गणेशोत्सव साजरा करण्याकडे कल

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेने परिपूर्ण आहे. माहितीचा स्फोट, कृत्रिम बुद्धिमत्ता, वेगवान जीवनशैली या सगळ्यामुळे माणसाचे जगणे पूर्वीपेक्षा खूप बदलले आहे. पण या साऱ्या बदलांमध्ये गणेशोत्सव आजही आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. गणेश हा विघ्नहर्ता, बुद्धीचा देव आणि आरंभीचा देवता मानला जातो. समाजाला एकत्र आणण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. त्यामुळे धार्मिकतेसोबतच सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्य वाढले. आज गणेशोत्सव फक्त धार्मिक न राहता सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय भान देणारा उत्सव झाला आहे. गणेशमूर्ती बनवताना शाडूची मूर्ती, नैसर्गिक रंग यांचा वापर करण्याचा संदेश समाजात पसरू लागला आहे. गणेशोत्सवात समाजातील विविध स्तरांतील लोक एकत्र येतात. कला, नृत्य, नाटक, कीर्तन, व्याख्यान यांचा कार्यक्रम घेऊन समाजात संस्कृतीची जपणूक केली जाते. फटाके, प्लॅस्टिक, रासायनिक रंग यांच्या प्रदूषणामुळे निसर्गाला धोका निर्माण होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही गरज बनली आहे. शिस्तबद्ध मिरवणुका, मर्यादित ध्वनी आणि पर्यावरणपूरक मूर्ती याकडे लोकांचा कल वाढत आहे. एकंदरीत, आजच्या युगात गणेशोत्सव हा परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम आहे. तो आपल्याला श्रद्धा, समाजहित, संस्कृती आणि पर्यावरण यांचा समतोल साधायला शिकवतो.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

••••

### कलियुगातील तमोगुणाचा प्रभाव

स्वयंशिस्त दुरापास्त होण्याचे मुख्य कारण म्हणजे तमोगुणाचा प्रभाव आणि तो का पडतो तर अरबट -सरबट आहारामुळे; तरीही जातीय राजकारण करून आमच्या खाण्यावर सुद्धा बंधने आणणार का? असा प्रश्न विचारून प्रसिद्धीच्या माध्यमात येण्याचा आटापिटा कोणी सोडायला तयार नाही. कोणी म्हणतो आम्ही नवरात्रीत मासे खातो, तर कोणी संकष्टीला मटण, कोणी जिवंत कोंबड्या हातात घेऊन मोर्चे काढतो; म्हणजेच स्वतःच्या जिभेवर ताबा नाही मग अशी मंडळी जनतेवर ताबा मिळवून काय साध्य करणार? दुकाने जर सरकारने बंद केली तर अशा मंडळींनी प्रथम दिवशी आपल्याला काय हवे ते घरी आणावे आणि त्याच्या भक्षणाचा सुखद अनुभव घ्यावा. कोरोना काळात काय करीत होतो, ते दिवस आठवावे. उगीच जातीय तेढ आणून काही साध्य होईल असे वाटत नाही. अशा मंडळींनी चांगुलपणाचे चिंतन करून तो आत्मसात करावा. सध्या त्याचीच कमतरता आहे. कर्तव्य, स्वधर्म व स्वयंशिस्त याची पायमल्ली करून निगरगट्ट राजनीतीची निर्मिती सातत्याने होते आहे आणि सहानभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्नही होतो आहे. धर्मावर ताशेरे ओढण्याआधी स्वधर्म आचरण करावा अन्यथा तोच स्वयंआचाराच्या चिंतनाचा विचार ठरतो आणि मग स्वातंत्र्यप्राप्ती शापित ठरते. किंकर्तव्यमूढ व गलितगात्र अर्जुनाला भगवान श्रीकृष्णांना भगवद्गीता सांगावीच लागली, तेच कार्य मोदींना सर्व व्याप सांभाळून करावे लागते आहे. कारण दुसऱ्याच्या घरात विषारी बॉम्ब टाकून भांडणे लावणाऱ्यांची संख्या वाढते. म्हणूनच हा सर्व कलियुगातील तमोगुणाचे प्रभाव म्हणावेसे वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

••••

### पोळा : बैलांप्रति कृतज्ञतेचा दिवस



महाराष्ट्रात पोळा श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो. बैलांचा उत्सव म्हणजे पोळा! बैल हा शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सोबती! कारण नांगरणीपासून ते पेरणी, दळणवळण यासाठी बैल शेतकऱ्याला मदत करतो. त्याच्या श्रमामुळेच शेतकऱ्याला पीक घेता येते. म्हणूनच बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची पूजा करून हा सण साजरा केला जातो. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना अंघोळ घालून, त्यांना तेल चोळून, सुंदर सजवून मिरवणुकीसाठी नेतात. बैलांच्या शिंगांना रंगवून, गळ्यात गजरे व गोंडे घालून, गोड पदार्थ खाऊ घालून त्यांचा सन्मान केला जातो. बैलांनी केलेल्या कष्टाचे स्मरण करून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी गावोगावी बैलांच्या मिरवणुका काढल्या जातात. शेतकरी बांधव एकत्र येऊन आनंदाने हा उत्सव साजरा करतात. एकंदरीतच पोळा हा शेतकऱ्याच्या कष्टकरी बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, निसर्गाची पूजा करण्याचा आणि समाजात एकोपा वाढविण्याचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून 'प्राण्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित होते.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लोटस पोदार लर्न स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ ऑगस्ट -**

लोटस पोदार लर्न स्कुलमध्ये दि. १५ ऑगस्ट रोजी भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमापुजनाने झाली. प्रतिमापुजन व ध्वजारोहणाचा मान शाळेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्माकर पाटील यांच्या हस्ते पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणुन अध्यक्ष पद्माकर पाटील, ॲड.प्रभाकर बिराजदार, पंकज पुदाले, अतुल पाटील, बापूराव गायकवाड, पत्रकार आकाश पोतदार आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या परेड मार्च ड्रिलने कार्यक्रमाला रंगत आली. यानंतर शाळेच्या प्राचार्या रेवती शिंदे मगर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक सादरीकरणात पोदार प्रेपच्या चिमुकल्यांनी आकर्षक रॅम्प वॉक सादर केला. पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य, तिसरी-चौथीतील विद्यार्थ्यांनी जोशपुर्ण झुंबा एरोबिक, तर पाचवी-सहावीतील विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित आंतरशालेय चित्रकला, निबंध लेखन, वक्तृत्व, नृत्य आणि गायन स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना मेडल, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमात योगेश सुर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अर्णव भोसले आणि समिक्षा बनसोडे यांनी केले तर आभार महेश कोरे यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...

### लिं.प्रभुलिंगेश्वर पुण्यतिथीदिनी विविध धार्मिक कार्यक्रम

**हजारो सद्भक्तांनी घेतला महाप्रसाद, दिक्षा, अय्याचार संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१८ ऑगस्ट -**



येथील श्री निलकंठेश्वर मठाचे मठाधिपती वैराग्यमूर्ती श्री.ष.ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अधिपत्याखाली मठात लिं.प्रभुलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी रात्री शिवभजन करण्यात आले. शनिवारी सकाळी महास्वामीजींच्या हस्ते समाधीस रुद्राभिषेक व महापुजा झाल्या नंतर मठात हजारो सदभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. रविवारी मठात महास्वामीजींनी शेकडो सदभक्तांना दिक्षा व अय्याचार दिला.

यावेळी मानव धर्माचा विजय असो-धर्मानेच विश्वाला शांती तसेच महास्वामीजींचा जय जयकार करण्यात आला. शनिवारी दिवसभरात हिरेनागाव, हरसूर, जेवळी, केसरजवळगा, अचलेर येथील महास्वामीजी तसेच वे.बसवराज शास्त्री तीर्थ यांच्यासह माजी मंत्री मधुकरराव चव्हाण आदी मान्यवरांनी हजेरी लावली. या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वे.विवेकानंद स्वामी व वे.नरेंद्र स्वामी यांनी केले. या कार्यक्रमास धाराशिव जिल्ह्यासह लातूर, सोलापूर तसेच पुणे, मुंबई, गुलबर्गा येथील सदभक्तांनी हजेरी लावली. या धार्मीक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबुराव कबाडे, महादेव मुळे, चंद्रशेखर शेटे, श्रीमंत मुळे, सरपंच रामचंद्र आलुरे, कल्याणी मुळे, अप्पू धमुरे, धनराज मुळे, संतोष मुळे, रामलिंग नरे, महेश कर्पे, श्रीशैल लंगडे, बाबुराव मुळे, गुरुनाथ मिटकरे, बसवराज नरे आदी श्री निलकंठेश्वर मंडळाचे सदभक्त तसेच महादेव तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

# कोणताही लाभार्थी धान्य योजनेपासून वंचित राहू नये

**अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांचे विभागांना निर्देश...धान्य आणि पोषण आहार थेट खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे सुचना...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

कोणताही लाभार्थी शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये,यासाठी सर्व यंत्रणांनी जबाबदारीने कार्य करावे,असे स्पष्ट निर्देश राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिले.ते आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत बोलत होते.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागेश मापारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी देवदत्त गिरी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, प्रभारी जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी किशोर गोरे व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे आदी उपस्थित होते.

श्री.ढवळे यांनी सांगितले की, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा उद्देश गरीब व गरजूंना मदत पोहोचवणे हा आहे.एखाद्या व्यक्तीकडे रेशन कार्ड असो वा नसो,त्याला धान्य आणि इतर सुविधा मिळाल्या पाहिजेत. गरजूंना रेशन कार्ड प्राधान्याने देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे ते म्हणाले. त्यांनी यंत्रणांना उद्देशून सांगितले की,शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत योजना पोहोचवणे हेच प्रशासनाचे खरे समाधानकारक कार्य ठरेल. बैठकीत विविध मुद्द्यांवर त्यांनी ठोस सूचना दिल्या.मयत स्थलांतरित नागरिकांची माहिती संकलित करून ती शासनाकडे सादर करावी, जेणेकरून त्यांच्या कुटुंबियांना योग्य ती मदत मिळू



शकेल.पोषण आहाराच्या बाबतीत ढवळे यांनी विशेष भर दिला.सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी पालक भेटी घ्याव्यात,मुलांच्या पोषण स्थितीची पाहणी करावी,तसेच जेथे अडचणी आहेत त्याबाबत त्वरित उपाययोजना करावी,असे निर्देश त्यांनी दिले.

याशिवाय, जिल्हा तक्रार निवारण अधिकारी यांच्या कार्यालयाची माहिती प्रत्येक आवश्यक ठिकाणी स्पष्टपणे लावण्यात यावी, जेणेकरून कोणत्याही लाभार्थ्याला तक्रार मांडण्यासाठी अडचण येऊ नये. लाभार्थ्याला त्याच्या हक्काचा लाभ मिळाला नाही,तर त्याची थेट नोंद तक्रार निवारण यंत्रणेकडे व्हायला हवी.अशा पारदर्शक यंत्रणेमुळे लोकांचा विश्वास वाढतो,असे त्यांनी सांगितले.

श्री.ढवळे यांनी आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. सोनोग्राफीदरम्यान कमी वजन असणाऱ्या अर्भकांची माहिती संकलित करून त्यांच्या कुटुंबियांना विशेष आहार, औषधोपचार व सल्ला देण्यात यावा,असे त्यांनी स्पष्ट केले. या कामासाठी आरोग्य विभाग व महिला व बालकल्याण विभागाने समन्वय साधावा,असेही त्यांनी सूचित केले.

श्री.ढवळे यांनी सांगितले की,धान्य खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे सर्वात समाधान देणारे कार्य आहे. यामध्ये कुठेही धान्य गळती होऊ नये. गरीब व गरजूंना मिळणारा एकेक दाणा हा त्यांच्या जगण्याचा आधार आहे. यासाठी अन्नधान्य वितरण प्रणाली मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला.

श्री.ढवळे पुढे म्हणाले की, अन्न आयोग स्वतः जिल्ह्यातील विविध भागांना भेट देणार आहे. पालकांशी थेट संवाद साधून पोषण आहार, शाळांमधील आहार व्यवस्था, तसेच धान्य वितरणाची प्रत्यक्ष स्थिती तपासली जाणार आहे.त्यामुळे प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे,अन्यथा प्रशासनाकडून कठोर पावले उचलली जातील,असा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीत जिल्हा परिषदेचे संबंधित अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. सर्व यंत्रणांनी दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

जिल्ह्यातील पुरवठा विभागाचे निरीक्षण अधिकारी,सर्व सीडीपीओ,सर्व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

## डिजे नको; लहान मुलांची भावनिक साद

**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

पोलिस स्टेशन शिराढोण, पीएश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व के.एन. विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ध्वनी प्रदूषणाविरोधात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी आम्हाला ड्जा नको, सण आहे युद्ध नाही, आवाज कमी ठेवा, हृदयाचा खून म्हणजे ध्वनी प्रदूषण अशा प्रभावी घोषणा देत नागरिकांना ध्वनी प्रदूषणाविरुद्ध सजग होण्याचे आवाहन केले.

या उपक्रमात दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पोलिस अधिकारी व अंमलदार सहभागी झाले. संपूर्ण गावातून काढलेल्या या रॅलीमुळे गावकऱ्यांमध्ये उत्साह व सकारात्मक चर्चा रंगली. येणाऱ्या सणांमध्ये डिजे न वापरता पारंपरिक पद्धतीने सण साजरे करण्याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

## शहरातील महादेव मंदिरात भाविकांनी मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ ऑगस्ट -**



श्रावण सोमवारी श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी नळदुर्ग शहरातील महादेव मंदिरात भाविकांनी मोठी गर्दी केली होती. व्यासनगर येथील श्री उत्तरेश्वर महादेव मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्याबरोबरच रंगी बेरंगी फुलांनी मंदिराची सजावट करण्यात आली आहे.

दि. १८ ऑगस्ट रोजी शेवटचा श्रावण सोमवार असल्यामुळे नळदुर्ग शहरातील श्रीक्षेत्र रामतीर्थ येथील महादेव मंदिर, अष्टलिंगेश्वर महादेव मंदिर, व्यासनगर येथील श्री उत्तरेश्वर महादेव मंदिर व मल्लिकार्जुन मंदिर यासह शहरात विविध ठिकाणी असणाऱ्या महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी विशेष करून महिला भाविकांनी पहाटेपासुनच गर्दी केली होती. यावेळी शहरातील सर्व महादेव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शेवटच्या श्रावण सोमवार निमित्त व्यासनगर येथील श्री उत्तरेश्वर महादेव मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्याबरोरच महादेव मंदिराला रंगी बेरंगी फुलांनी अतिशय सुंदरपणे सजविण्यात आले होते. हे मंदिर राष्ट्रीय महामार्गालगत असल्यामुळे या मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी कायम भाविकांची गर्दी असते. याठिकाणी पहाटेपासुन भाविक दर्शनासाठी येतात याठिकाणी भाविकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची काळजी घेत मंदिराचे प्रमुख दत्तात्रय भाळे व अमर भाळे यांनी उपाययोजना केल्या आहेत. त्याचबरोबर याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले आहेत.भाविकांनी महादेव मंदिर फुलुन गेले होते. तसेच हर, हर महादेव च्या जयघोषाने वातावरण प्रफुल्लित झाले होते.

## खिरणी मळा : आरोग्य केंद्र, अंगणवाडी व अभ्यासिका सुरु करण्याची मागणी

**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

शहरातील खिरणी मळा परिसरात बंद असलेली न.प.शाळा क्र. ५ च्या इमारतीमध्ये आरोग्य केंद्र, अंगणवाडी/शाळा किंवा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका (वाचनालय) सुरु करण्याची मागणी केली आहे. या निवेदनावर आयाज शेख, मुसव्वीर मोमीन, अफोरज पठाण, रनविर इंगळे, रिजवान पठाण, शेखर घोडके, सरताज कुरेशी, आदिल कुरेशी, शेख असिम, अरबाज पठाण, शेख हुजेफा, तांबोळी आबुहुरेर, आमेर काझी, सय्यद अरबाज यांच्यासह अनेक नागरिकांनी सह्या करून आपला पाठिंबा दर्शविला आहे.

## तेरणा, लोहगाव-खंडाळा प्रकल्पाचे आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते जलपूजन



**तेर, दि.१८ ऑगस्ट -**

तेरणा धरणातील पाण्याचे पूजन आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ॲड. दत्ता देवळकर, गफार काझी, शिवाजीराव नाईकवाडी, निहाल काझी, झुंबर बोडके, तेरच्या सरपंच दीदी काळे, भास्कर माळी, जुनेद मोमीन, मंगेश फंड, मज्जित मनियार, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता अजित मदने, उपअभियंता धनराज वरपे, शाखा अभियंता किरण जगदाळे व नागरिक उपस्थित होते.



**तभा वृत्तसेवा**
**लोहगाव, दि.१८ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील लोहगाव येथील खंडाळा प्रकल्प पूर्ण क्षमतेने तुडूंब भरला असून सांडव्यातून पाणी वाहत आहे. त्या अनुषंगाने रविवार (दि.१७) तुळजापूर तालुक्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते प्रकल्पाचे जलपूजन करण्यात आले.

यावेळी लोहगावचे सरपंच प्रवीण पाटील, उपसरपंच प्रशांत देशमुख, माजी पं.स सभापती रेणुका इंगोले, कृउबाचे संचालक सिध्देश्वर कोरे, भाजपा नळदुर्ग मंडळ अध्यक्षा रंजना राठोड, भाजपा नेते रावसाहेब घुगे,

विजय शिंगाडे, विलास राठोड, अंगद जाधव, विवेकानंद मेलगीरी, सचिन घोडके,दामाजी राठोड, माजी ग्रामपंचायत सदस्य निजाम शेख, सतिश काटे, महेबुब शेख, सुनिल बनसोडे, मारुती बनसोडे, पंकज पाटील,अदिती कुलकर्णी, अंगद इंगोले,

सोसायटी चेअरमन राहुल मारेकर, शिवानंद कलशेट्टी, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष राहुल शेंडगे यांच्यासह परिसरातील गावातील नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंबच्या आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य; प्रशासनाचे दुर्लक्ष

**शेतकऱ्यांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात**

**तभा वृत्तसेवा/परवेझ मुल्ला**
**कळंब, दि.१८ ऑगस्ट -**





धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून कळंबकडे पाहिले जाते. या ना त्या कारणाने तालुक्यासह शेजारील केज, वाशी, लातूर, धाराशिव, बार्शी आदी भागातील नागरिक खरेदी-विक्रीसाठी दररोज येतात. शहरात आठवडी बाजार हा दर सोमवारी भरत असल्याने मोठ्या प्रमाणात भाजी-आपल्यासह इतरही गरजु साहित्याचा मोठा बाजार भरतो. मात्र, या आठवडी बाजारात घाणीचे साम्राज्य पसरले असून शेतकऱ्यांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

शहरातील बस स्थानकाच्या शेजारी असलेल्या स्वतंत्र जागेत नगर पालिकेच्या वतीने लाखो रुपये खर्चून भाजीपाला विक्री करणाऱ्यांना निवाऱ्यासाठी पत्र्याचे शेड, सिमेंट कट्टे, सिमेंट रस्ते, शौचालय, दोन मोठे गेट आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या मात्र याची देखभाल न.प.प्रशासनाने न केल्याने या परिसरात कोणी लघुशंकेसाठी, कोणी नशेसाठी, जणावरे बांधण्यासाठी, तर काही आंबटशौकीन, मांसविक्री, शौचासाठी याचा आठवडाभर वापर केला जातो.

सोमवारी बाजार भरत असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी आपला भाजीपाला घेऊन विक्रीस येवून घाणीत बसून विक्री करतात.

यामुळे या आठवडी बाजारात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून शेतकर्यांसह बाजारकरुंना घाणीचा व दुर्गंधीचा सामना करावा लागत असल्याने शेतकऱ्यांस नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या आठवडी बाजारात विक्री करणाऱ्यांकडून प्रत्येकी १० रुपये कर सक्ती वसुल केला जातो.

मात्र या घाणीच्या साम्राज्याचे शेतकऱ्यांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून प्रशासन याकडे लक्ष देईल का? असा प्रश्न जनतेतून केला जात आहे.

## दानशूरांच्या सहकार्यातून शाळेचा विकास प्रेरणादायी : ॲड.शितल चव्हाण

**ॲड.शितल चव्हाण यांच्याकडून जि.प.हायस्कूल शाळेला डायस भेट**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ ऑगस्ट -**




येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील दहावीच्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ प्रसंगी उमरगा शहरातील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड.शितल चव्हाण बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा शहरातील प्रसिद्ध उद्योजक एल.टी.मोरे व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष सिद्धाराम आप्पा चिंचोळे उमरगा तालुक्यातील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. प्रवीणचंद्र तोतला, सोलापूरचे शाळेचे माजी विद्यार्थी मंगेश देशमुख रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.धनंजय मेनकुदळे सचिव प्राध्यापक जोशी, माजी अध्यक्ष सतीश साळुंके, प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते.

पुढे ॲड.चव्हाण म्हणाले की जिल्हा परिषद हायस्कूल ला दानशूर व्यक्तींची खूप मोठी परंपरा आहे. या प्रशालेतून अनेक गरीब विद्यार्थी समाजातील दानशूर व्यक्तींच्या पुढाकाराने व दत्तक घेऊन आज मोठ्या पदावर कार्यरत आहेत. मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या प्रयत्नातून समाजातील स्वंयसेवी संस्था रोटरी क्लब आणि उमरगा शहरातील दानशूर व्यक्ती तसेच शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून या शाळेतील शिक्षण घेत असलेल्या गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण केलेला आहे, असे मत ॲड शितल चव्हाण यांनी व्यक्त केले. तर ॲड.तोतला यांनी शिक्षणासाठी गरिबी अडसर ठरू शकत नसल्याचे मत व्यक्त करून विद्यार्थ्यांनी कठीण मेहनत करावी वाचन करावे म्हणजे समाजातील दानशूर व्यक्ती आपणास मदत करण्यास तयार आहेत.

यावेळी डॉ.प्रा.धनंजय मेनकुदळे शकुंतला मोरे यांनी पण आपले विचार व्यक्त केले. प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांना अविनाश काळे, हरिप्रसाद चांडक, रविराज बिराजदार शंकर सुरवसे गोपाळ आष्टे, रमेश होदलूरकर, प्रविण स्वामी, शकुंतला मोरे, शितल जावळे, डॉ.प्रमोद बर्मा, प्रभावती जाधव, दिलीप पोतदार, प्रा.किरण सगर, गोपाळ आष्टे, प्रा. युसुफ मुल्ला, राम साळुंके, विजय केशवशेट्टी, प्रदीप चालुक्य हरिप्रसाद चांडक, शोभा टोणपे, चार्टर्ड अकाउंटंट लक्ष्मीकांत शिंदे, ॲड.शितल चव्हाण प्रताप मोरे, शिवानंद आळंगे, प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, सरिता उपासे, धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे यांच्याकडून जवळपास ३५ हजार रुपयाचे बक्षीस शाळेतील प्रथम येणाऱ्या सृष्टी सतीश बिराजदार शाळेतून द्वितीय येणारी ममता अमर वरवटे, मुलात प्रथम येणारा साहिल बानकर, प्रेम अंतरेड्डी, यासीन खैराटे, अक्षरा पवार, अक्षरा तळभंडारे, अक्रम बागवान या विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावर्षी शाळेचा निकाल १०० टक्के लागल्याने प्रशालेतील माध्यमिक शिक्षक बशीर शेख, धनराज तेलंग, विद्यानंद सुत्रावे फजल शेख पूजा गुंडीले या शिक्षकांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे सूत्रसंचालन सरिता उपासे तर आभार शिल्पा चंदनशिवे यांनी मांडले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय रुपाजी, सदानंद कुंभार, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील, पूजा गुंडीले, धनराज गाडेकर, राजू सरपे, नागसेन बनसोडे यांनी परिश्रम घेतले विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## राजपत्रित अधिकारी संघटनेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**जिल्हाध्यक्ष अनंत कुंभार, कार्याध्यक्ष संतोष नलावडे, सचिव हेमंत भिंगारदेवे, तर कोषाध्यक्ष अमोल ताकभाते यांची निवड**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑगस्ट -**

महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेची धाराशिव जिल्हा कार्यकारिणी १३ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत एकमताने जाहीर करण्यात आली. नव्या नेतृत्वामुळे संघटनेच्या कार्यात उत्साहाचे नवे पर्व सुरू होणार असल्याचा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

जिल्हाध्यक्षपदी अनंत कुंभार, कार्याध्यक्षपदी संतोष नलावडे, सचिवपदी हेमंत भिंगारदेवे, तर कोषाध्यक्षपदी अमोल ताकभाते यांची निवड झाली. मार्गदर्शकपदी अनुप शेंगुलवार व रावसाहेब चकोर, तर संघटकपदी प्रशांतसिंह मरोड व मनोज राऊत यांची निवड झाली.

महिला प्रतिनिधी म्हणून सीमा गवळी व पद्मा मांजरे यांची निवड झाली. प्रसिद्धी प्रमुखपदी विनोद जाधव तर सहप्रसिद्धी प्रमुखपदी मोहन राऊत यांची निवड करण्यात आली.

सदस्य मंडळावर लक्ष्मण वाजे, ओंकार गायकवाड, जे.टी. वग्गे, बी.यु.उगलमोगले, अक्षय काळे व प्रदीप शिंदे यांचा समावेश करण्यात आला आहे. या बैठकीस राज्य सरचिटणीस व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) तुकाराम भालके उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# घाणेवाडी तलावाचे आ. खोतकरांनी केले जलपूजन

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या घाणेवाडीच्या तलावातील जलपूजन रविवारी आ. अर्जुनराव खोतकर यांनी केले. सध्याच्या दमदार पावसामुळे घाणेवाडी जलाशयात १६ फुट पाणीसाठा झाला आहे. समाधानकारक जलाशयात जलसाठा असल्यामुळे आगामी काळात जालना शहरवासीयांना मुबलक पाणीपुरवठा होईल असा विश्वास आ. अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी व्यक्त केला. याच दरम्यान आ. अर्जुनराव खोतकर यांनी जलाशय परिसरात सुरू असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. सौरऊर्जा प्रकल्पाचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यास सौरऊर्जेचा वापर करणारी जालना महानगर पालिका देशातील पहिली पालिका असेल असा दावा आ. अर्जुनराव खोतकर यांनी केला. आज रोजी महापालिकेला महावितरणच्या वीज वापरामुळे सुमारे चार कोटी रूपयांपेक्षा अधिक खर्च दर महिन्यात सोसावा लागतो. सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यास चार कोटी रूपयांचा खर्च कमी होण्यास हातभार लागणार असल्याचा विश्वास आ. अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला. या प्रकल्पासाठी आपण विशेष प्रयत्न करून ९७ कोटी रूपये मंजूर करून आणले. त्यानंतर हा प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आहेत. आपण अनेक कामे गावावाजा न करता पूर्ण करत असल्याचे सांगून माजी आ. कैलास



गोरंट्याल यांचे नाव न घेता त्यांच्या टीकास्त्र सोडले. घाणेवाडी जलाशयाचे जलपूजन वेळी पंडितराव भुतेकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, गणेश राऊत, मेघराज चौधरी, राहुल हिवराळे, किशोर पांगारकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपात युवकांचा प्रवेश

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास ठेवून व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली मस्तगड, जालना येथील नवयुवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला यामध्ये पियुष मुंगसे, यश मस्के, हरिओम डोळझाके, साई कासार, मंथन यादव, साई कासार,कुशल श्रीगादी, राहुल कुमावत, नैतिक आंबिलवादे, शुभम रहाड, आज्ञान भगत, तनिष्क मस्के, आशिष हेलगट, वंश गाजरे,



अमेय जोशी, ईश्वर तिडके, कृष्णा कुलथे, वैष्णव तायडे, वैभव कोल्हे या तरुणांनी आज भाजपा परिवारात सामील पक्षाला नवी उर्जा दिली आहे.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी सर्व युवकांचे मनापासून स्वागत केले व नव्या ऊर्जेच्या फळीमुळे पक्ष अधिक सक्षम व सबळ होईल असा विश्वास व्यक्त केला. या प्रवेश प्रसंगी शिवाजी दादा शेजुळ, ग्रामीण तालुकाध्यक्ष संजय डोंगरे व पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जालना जिल्ह्यातील बहिणींकडून देवाभाऊंसाठी राख्यांचे संकलन



तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी कार्यालयात महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्यासाठी जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्यातील बहिणींनी प्रेमाने पाठवलेल्या राख्यांचे संकलन करून माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. या प्रसंगी ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, मा. आ. कैलाश गोरंट्याल, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर जिजा भांदरगे, राजेशजी राऊत, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे माजी नगराध्यक्ष सौ. संगीताताई गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. संध्याताई देठे, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. शुभांगीताई देशपांडे, सरपंच सौ. अश्विनीताई पवार, मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, सुनील खरे, अमोल धानुरे, महेश निकम, भगवान मात्रे, संजय आटोळे, सरचिटणीस, सुनील पवार, अर्जुनजी गेही, धनराज काबलिये तसेच भाजपाचे सर्व पदाधिकारी, नगसेवक, मोर्चाचे अध्यक्ष, महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला मोर्चा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या सामाजिक उपक्रमाला विशेष उभारी दिली.

### मा. नगराध्यक्ष अग्रवाल यांच्या स्वखर्चातून परतुर शहरात विविध प्रभागात सफाईसह सिसि रोडच्या कामाला सुरुवात !



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

शिवसेना पक्षाचे तसचे परतुर नगर पालिकेचे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांनी स्वच्छतेचा पुढाकार घेत स्वखर्चातून परतुर शहरातील गाव भागात असलेल्या खतीजा मज्जित, लड्डा कॉलनी, परिसरात भूमिगत गटार व सीसी रोड चे काम करण्यास सुरुवात केली आहे. परतुर शहरातील गाव भागातील लड्डा कॉलनी खातीजा मस्जिद परिसरात रस्त्याची झालेली दयनीय अवस्था, जागोजागी पडलेले खड्डे पाहता तसेच सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नाही हे सर्व पाहून माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांनी स्वखर्चातून भूमिगत गटार बांधून देण्याचा शब्द येथील प्रभागातील नागरिकांना या वेळी दिला असता आज रोजी प्रत्यक्षात सीसी रोड च्या कामाला सुरुवात झाली होती व भूमिगत गटार पूर्ण होत आहे. म्हणून परिसरातील नागरिक माजी नगराध्यक्ष मोहण अग्रवाल यांचे आभार मानले आहे .

### मा.आ. गोरंटयाल यांच्या नेतृत्वात युवकांचा भाजपामध्ये प्रवेश!



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

जालना विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दरेगाव (ता.जालना) येथील अनेक युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. शहरातील प्रितीसुधा नगर मधील निवासस्थानी झालेल्या या प्रवेश सोहळ्यात दरेगाव येथील अविनाश धोत्रे, संजय ढवळे, अमोल पडोळ, राहुल सरोदे, दिनेश लष्कर, गणेश सरोदे, सतीश धोत्रे, गणेश कोल्हे, अजय लष्कर, योगेश शिसुदे, सूरज लष्कर, कृष्णा बोरुळे, राम बुचळे, अर्जुन धोत्रे, दिलीप जाधव, रोहन शिंदे, राहुल राठोड, अभिषेक गुंजाळ आदींचा समावेश असून या सर्वांचे गोरंटयाल यांनी भाजपाचा रुमाल देवून स्वागत करून आगामी काळात भाजपचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी युवानेते अक्षय गोरंटयाल, शिवाजी शेजुळ, श्रीमती नम्रता थाडा, जैस्वाल, संतोष माधोले आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सामाजिक न्याय विभागाची परतुर कार्यकारणी जाहीर

## ता. अध्यक्षपदी प्रधान, उपाध्यक्ष पदी शेजुळ, शहर अध्यक्षपदी आखाडे



तभा वृत्तसेवा
परतुर /प्रतिनिधी

परतुर शहरातील शाषकीय विश्राम गृहात अनेक कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश घेत सामाजिक न्याय विभागाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून कार्यक्रमात नियुत्या करण्यात आल्या महाराष्ट प्रदेश सहसचिव रमेश पाईकराव, मराठवाडा अध्यक्ष सुबोध जाधव, जालना जिल्हा अध्यक्ष प्रभाकर घेवंदे, जालना शहर अध्यक्ष सुनिल डोळसे, परतुर तालुका अध्यक्ष प्रभाकर प्रधान यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे प्रस्तापिक ता. अध्यक्ष प्रभाकर प्रधान यांनी केले या वेळी ॲड. महेंद्र वेडेकर, सुनिल डोळसे, रमेश पाईकराव व जिल्हा अध्यक्ष प्रभाकर घेवंदे यांनी मनोगत व्यक्त केले या वेळी जिल्हा अध्यक्ष प्रभाकर घेवदे यांणी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की राष्ट्रवादी पक्ष चांदया पासून ते बांद्यापर्यंत नेण्याचे काम आपल्या सर्वाणा करायचे आहे सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून गाव तेथे शाखा स्थापन करूण राष्टीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचे हात बळकट करण्याचे तुम्हाला आम्हाला करायचे आहे. जोमाने काम करून पक्ष संघटना मजबुत करा मत त्यांणी व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत दवंडे यांणी केले यावेळी पांडुरंग शेजुळ तालुका उपाध्यक्ष प्रविन मोरे तालुका कार्याध्यक्ष जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ शिरसाठ राहुल आखाडे शहराध्यक्ष परतुर गोरख मस्के सहसचिव रामेश्वर पाडेवार शहर उपाध्यक्ष दीपक ठोके तालुका सचिव यांची निवड जिल्हा अध्यक्ष प्रभाकर घेंवदे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊण करण्यात आली.

# मौजे धोंडी पिंपळगावच्या नागरिकांचा प्लॅस्टिक बंदीचा निर्णय!!



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील मौजे धोंडी पिंपळगाव येथील रहिवासियांनी प्लॅस्टिक संकलन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, मारोती मंदिर परिसर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व परिसर, समाज मंदिर व हेतर सार्वजनिक ठिकाणे व गावातील ओसाड परिसर संपूर्ण गावकऱ्यांनी श्रमदानातून स्वच्छता कचऱ्याचे संकल्प घेतला व गावातील प्लास्टीक पिशव्या व इतर घनकचरा संकलन करून एका ठिकाणी गोळा करण्यात आहे तसेच गोळा केलेला घन कचरा व प्लास्टिक कचरा याचे ववस्थापन करुण नष्ट करण्यात आला. तसेच यापुढे मौजे धोंडी पिंपळगाव या गावामध्ये प्लॅस्टिक वापर बंदीचा ठराव मांडला आहे. तसा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती ग्रामविकास अधिकारी पवार यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.

यावेळी उपस्थित सरपंच यमुनाबाई रनशूर, ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र बी. पवार, मुख्याध्यापक एम. जी. खरात, ग्रामपंचायत सदस्य राजेभाऊ मोरे, शिवाजी भुतेकर, सुरेश टकले, संदीप शिंदे तसेच माजी सरपंच लतेश शिंदे, कैलास भुतेकर, रामप्रसाद मोरे, पांडुरंग मोरे, पांडुरंग सुर्ये, ज्ञानेश्वर शिंदे, विलास टकले, नागनाथ शिंदे, जीवन टकले, सुनील टकले, अरुण गाडेकर, कालिंदा दवंडे, विमल मोरे, अरुणा उगले, शालेय समिती अध्यक्षा टकले यांच्यासह गावातील महिला व ग्रामस्थांची मोठी संख्या होती तसेच गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता .

# जिल्ह्यात सरासरी ३५ मि. मी. पावसाची नोंद

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जिल्ह्यात दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळपर्यंतच्या मागील २४ तासात सरासरी ३५.९० मि. मी एवढ्या एकूण पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात झालेल्या पावसाची तालुका निहाय आकडेवारी मि. मी. मध्ये पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी यंदाच्या एकूण पावसाची आहे. जालना ३२.०० (५२८.६०), बदनापूर ५३.४० (५०९.७०), भोकरदन २५.०० (४१८.५०), जाफ्राबाद २९.७० (४९४. ७०), परतूर १२.१० (४७३.६०), मंठा २१.७० (४६२.१०), अंबड ५१.७० (४५०.००), घनसावंगी ४८.६० (५०२.००) मि. मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात आजपर्यंत वार्षिक सरासरीच्या एकुण ७९.२१ टक्के एवढ्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात सरासरी ३५ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे.

# देशाच्या स्वातंत्र्यदिना बरोबर निरंकारी मिशनने साजरे केले आत्मिक जागृतीचे पावन पर्व : मुक्ती पर्व

## भक्तीमध्ये स्वातंत्र्याची मुक्ती – निरंकारी राजपिता रमितजी

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनीधी

संपूर्ण भारतवर्षात जिथे स्वातंत्र्याच्या ७९ व्या गौरवशाली वर्षांचा उत्सव साजरा केला, तिथे संत निरंकारी मिशनने आत्मिक स्वातंत्र्याच्या रूपात श्रद्धा आणि समर्पणाने युक्त अशा मुक्ती पर्व दिवसाचे आयोजन केले. हे पर्व केवळ एक स्मरण नाही, तर आत्मिक चेतनेची जागृती आणि जीवनाचा परम उद्देश याचे प्रतीक आहे. मुक्ती पर्व दिवसाचा मुख्य संत समागम आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन अध्यक्षतेखाली दिल्लीतील निरंकारी ग्राउंड क्र.८, बुराडी रोड येथे आयोजित करण्यात आला. तसेच विश्वभरातील मिशनच्या सर्व शाखांमध्येही मुक्ती पर्वाच्या निमित्ताने विशेष सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करत मिशनमध्ये होऊन गेलेल्या महान संतांना अभिवादन करण्यात आले. त्यामध्ये शहनशाह बाबा अवतारसिंहजी, जगत माता बुद्धवंतीजी, राजमाता कुलवंत कौरजी, माता सविंदर हरदेवजी, भाईसाहेब प्रधान लाभ सिंहजी व इतर अनेक समर्पित संतांचे हृदयपूर्वक स्मरण करुन त्यांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा प्राप्त करण्यात आली. स्थानिक स्तरावर संत निरंकारी सत्संग भवन, गांधी चमन, रेल्वे स्टेशन रोड, जालना येथे मुक्ती पर्व दिवसानिमित्त विशेष सत्संग समारोह आयोजित करण्यात आला ज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील भाविक भक्तगणांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. आध्यात्मिकतेच्या पवित्र वातावरणात समस्त भक्तगणांना संबोधित करताना निरंकारी राजपिताजी



म्हणाले, की आज १५ ऑगस्टला संपूर्ण देश स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करत आहे. त्याच वेळी संतजन याला मुक्ती पर्वाच्या माध्यमातून आत्मचेतना आणि भक्तीचा संदेश देऊन साजरा करत आहेत. जसे तिरंगा झेंडा आणि देशभक्तीपर गीतं स्वातंत्र्याचे प्रतीक आहेत तसेच एका भक्ताचे जीवन सेवा, समर्पण आणि भक्तीच्या सुगंधाने भरलेले असते. सतगुरूंनी दिलेल्या ब्रह्मज्ञानात खरे स्वातंत्र्य आहे जे आपल्याला मीपणा आणि अहंकारापासून मुक्त करते. मुक्ती पर्वाची मूळ भावना ही आहे, की जसे भौतिक स्वातंत्र्यता आपल्याला राष्ट्राच्या उन्नतीचा मार्ग दाखवते, तसेच आत्मिक स्वातंत्र्यता अर्थात जन्म–मृत्यूच्या बंधनातून मुक्तता ही मानवी जीवनाची परम उपलब्धी आहे. ही मुक्ती केवळ ब्रह्मज्ञानाच्या दिव्य ज्योतीमुळेच शक्य आहे, जी आत्म्याला परमात्म्याशी जोडते आणि या मानवी जीवनाच्या वास्तविक उद्देशाचा बोध करून देते.

# जालना अतिवृष्टी अनुदान घोटाळा - निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप, एसआयटी चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांसाठी मंजूर अनुदान वाटपात तब्बल ७९.६७ कोटी रुपये (७९६,७९७,०३८ रुपये) अपहाराचा घोटाळा उघडकीस आला आहे. या प्रकरणाने शेतकरी आणि राजकीय वर्तुळात प्रचंड संताप पसरला आहे. आज परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार आणि माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी पत्रकार परिषद घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख असलेल्या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी हे या घोटाळ्यात प्रत्यक्ष सामील असून, दोषी कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी कागदपत्रे दडवत असल्याचा दावा केला आहे. लोणीकर यांनी निवासी



उपजिल्हाधिकाऱ्यांची SIT मार्फत तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून या घोटाळ्याची खरी व्याप्ती, जी १५० कोटींहून अधिक असू शकते, समोर येईल.

लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत संतप्तपणे सांगितले की, निवासी उपजिल्हाधिकारी हे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेचे मूळ केंद्रबिंदू आहेत. त्यांनी दोषी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक आणि तहसीलदार यांना संरक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक FIR दाखल करण्यास टाळाटाळ केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी घोटाळ्याचे अनेक कागदपत्र दाबून ठेवले आहेत. त्यांनी मोठमोठे आकडे लपवले असून, या भ्रष्टाचाराची खरी रक्कम १५० कोटींहून जास्त आहे. SIT चौकशीशिवाय या प्रकरणाची सत्यता समोर येणार नाही, असे लोणीकर यांनी ठणकावले. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांमध्ये या घोटाळ्यामुळे प्रचंड रोष आहे. विरोधी पक्षांनी, विशेषत: काँग्रेसने, सरकारवर टीका करत शेतकऱ्यांच्या पैशावर लुट असल्याचा आरोप केला आहे. लोणीकर यांनी यावरून सरकारला पाठिंबा देताना सांगितले की, सरकार कारवाईसाठी कटिबद्ध आहे, पण निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांसारखे अधिकारी याला खीळ घालत आहेत.

या प्रकरणाने मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांतही अनुदान वाटपाची चौकशी तीव्र केली आहे. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी १५ ऑगस्ट रोजी कारवाईची ग्वाही दिली होती, पण निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवरील आरोपांमुळे हे प्रकरण नव्या वळणावर आले आहे. SIT चौकशी होणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अंबड तालुका (१३८ गावे), बोगस शेती नसलेले खोटे लाभार्थी, १४,३५४ लाभार्थी, अपहार रक्कम ३३९,१७१,३५४ रुपये. डबल/दुबार अनुदान लाभार्थी, २,३१९ शेतकरी, अपहार रक्कम ४१,७६०,३८४ रुपये. क्षेत्र वाढवून बोगस अनुदान, ३,०९७ लाभार्थी, अपहार रक्कम ६१,५०१,८९६ रुपये. शासकीय जमिनीवर अनुदान, २२ प्रकरणे, अपहार रक्कम ६७३,७६० रुपये. एकूण अपहार रक्कम, ४४३,१०७,३९४ रुपये.

घनसावंगी तालुका (११५ गावे), बोगस शेती नसलेले लाभार्थी, ११,९६१ लाभार्थी, अपहार रक्कम २१२,१००,८९५ रुपये. डबल/दुबार अनुदान लाभार्थी, १०,५४५ शेतकरी, अपहार रक्कम १२५,९७१,४४८ रुपये. क्षेत्र वाढवून बोगस अनुदान, ८६१ लाभार्थी, अपहार रक्कम १५,१०४,०१६ रुपये. शासकीय जमिनीवर अनुदान, २२ प्रकरणे, अपहार रक्कम ५१३,२८४ रुपये. एकूण अपहार रक्कम, ३५३,६८९,६४४ रुपये. एकूण अपहार (अंबड + घनसावंगी) रक्कम ७९६,७९७,०३८ रुपये (७९.६७ कोटी रुपये).

### लोणीकर यांचे आवाहन

शेतकऱ्यांचा पैसा हा त्यांचा हक्क आहे. निवासी उपजिल्हाधिकारी आणि इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांनी या पैशावर डल्ला मारला आहे. मी स्वत: या प्रकरणात डखळ चौकशी होईपर्यंत आणि सर्व दोषींना तुरुंगात टाकेपर्यंत लढत राहीन. शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असे लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत ठणकावले.

# हिंगोली जिल्ह्यात पावसाचा हाहाकार

## जिंतुर-सेनगाव रस्ता बंद, कयाधू, पैनगंगा नदीला पूर, हजारो हेक्टर शेतीमध्ये पाणी शिरले













**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ ऑगस्ट**

मागील तीन दिवसांपासून हिंगोली जिल्ह्यात पावसाने थैमान घातले असून सोमवारी येलदरी धरण ओव्हर फ्लो झाल्यामुळे पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आल्यामुळे जिंतुर-सेनगाव मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आहे. दुसरीकडे जिल्ह्यातून वाहणाऱ्या कयाधू नदीला पूर आल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. इसापूर, येलदरी, सिध्देश्वर धरणातून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सेनगाव तालुक्यातील घोरदरी शिवारातील नाल्यात वाहून एका तरूणाचा मृत्यू झाला आहे. अनेक गावात पावसाचे शेतात साचल्यामुळे हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली असून शेती पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे. शहरातील जलेश्वर तलाव पहिल्यांदाच पूर्णपणे भरला असल्याचे दिसत आहे. पावसामुळे जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

हिंगोली जिल्ह्यात सोमवार दि १८ रोजी पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरूवात झाली आहे. या पावसामुळे शहरातून वाहणारी कयाधू नदीला पूर आला असून महादेववाडी, मंगळवारा भागात नदीकाठी राहणाऱ्या लोकांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच पूलावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अतिवृष्टी सदृश पावसामुळे हिंगोली तालुक्यातील नदी, नाले, ओढे यांना पूर आला असून शेताला तळ्याचे स्वरूप आले आहे. शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे. कनेरगाव नाका येथून वाहणाऱ्या कनेरगाव नदीला पूर आला असून नदीकाठचे महादेवाचे मंदिर पाण्याखाली गेले असून नदीकाठच्या घरांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. शहरात सोमवारी शाळांमध्ये ग्रामीण भागातील आलेल्या मुलामुलींना घेऊन येणाऱ्या वाहन चालकांनी रस्त्यात येणाऱ्या नदी, ओढे तसेच नाल्यांना पूर आल्यामुळे परत गावी नेतांना दिसत होते. हिंगोली शहरातील गांधी चौक, इंदिरा गांधी चौक, जवाहर रोड तसेच इतर सखल भागात पाणी साचल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. तसेच रस्त्यावर विक्री करणारे फुटकळ व्यापाऱ्यांना या पावसाचा मोठा तडाखा बसला असून मागील तीन दिवसांपासून त्यांचे व्यवहार ठप्प पडले आहेत. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हिंगोली तालुक्यातील पारोळा तलाव पूर्णपणे भरला असून येथील धबधबा प्रवाहीत झाला आहे. हा धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांनी गर्दी केली आहे. तरूण-तरूणी धबधब्यामध्ये पोहण्याचा आनंद घेत असतांना दिसत आहेत.

औंढा नागनाथ शहरात दोन दिवसांपासून संततधार पाऊस पडत असल्यामुळे औंढा नागनाथ शहरापासून एक किमीवर असलेले आदीनागनाथ ज्योर्तिलिंगाचे मंदिरातील शिवलिंग पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे भाविकांना बाहेरून दर्शन घ्यावे लागत असल्याचे दिसत आहे. तालुक्यातील सिध्देश्वर धरण पूर्णपणे भरले असून आठ दरवाजे उघडले आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. औंढा नागनाथ शहराला पाणीपूरवठा करणारा तलाव पूर्णपणे भरला आहे.

कळमनुरी तालुक्यातील इसापूर धरणाचे १३ दरवाजे उघडले असून त्यामधून ५४ हजार ४६६ क्युसेस पाणी पैनगंगा नदीमध्ये सोडण्यात येत आहे. त्यामुळे सलग तिसऱ्या दिवशीही मराठवाडा आणि विदर्भाचा संपर्क तुटला आहे. तालुक्यातून वाहणारी कयाधू नदीला अनेक ठिकाणी रौद्ररूप धारण केले असून पैनगंगा, कयाधू नदीचे पाणी शेतात शिरल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

सेगनाव तालुक्यातील आजेगावकडे जाणाऱ्या तीनही पूलावरून पाणी वाहत असल्यामुळे या गावाचा संपर्क तुटला आहे. पावसामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. याशिवाय खडकपूर्णा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने येलदरी धरणात पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे येलदरीचे चार दरवाजे एक मीटरने तर सहा दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहेत. त्यातून २९ हजार ४८० क्युसेस पाण्याचा विसर्ग केला जात आहे. येलदरीतून पाणी सोडण्यात आल्याने सिध्देश्वर धरणाच्या पाणी साठ्यात वाढ होत आहे.

जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, तहसीलदार शारदा दळवी, तहसीलदार जीवककुमार कांबळे, तहसीलदार हरीश गाडे यांच्यासह महसूल पथकाने नुकसानग्रस्त भागात जाऊन पाहणीला सुरूवात केली आहे.

# संत निरंकारी फाऊंडेशनतर्फे रक्तदान शिबीर
## १०० जणांनी केले रक्तदान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १८ ऑगस्ट**

येथे संत निरंकारी चारिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवारी ता १७ संत निरंकारी भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या शिबिरात शंभर रक्तदात्यांनी रक्तदान केले

हिंगोली जिल्ह्यांमध्ये सामाजिक उपक्रमामध्ये अग्रेसर असलेल्या संत निरंकारी मंडळाने यावर्षी रविवारी तारीख १७ संत निरंकारी सत्संग भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन सकाळी ११ वाजता झाले यावेळी इमा संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर राजेश पवार, राम कयाल, नेत्रशल्य चिकित्सक डॉक्टर किशोर लखमावार, डॉक्टर हेडगेवार दंत महाविद्यालयाचे संचालक ललित खुराणा, डॉ सचिन बोधगिरे, डॉ गुंडेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सकाळी ११:०० वाजल्यापासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरामध्ये शंभर रक्तदात्यांनी रक्तदान केले हिंगोलीच्या शासकीय रक्तपेढीला रक्त बाटल्या देण्यात आले आहेत

या शिबीरासाठी कन्हैयालाल नेणवाणी लालचंद नेणवानी, नानकराम नेणवानी, गोपालदास नेनवाणी राजकुमार नेणवानी, राजू लोखंडे, संजय जाधव पवन पाटील तन्वी नेणवानी रोनक नेणवानी ओम नेणवानी संतोष नेतवाणी अमित नेनवाणी सोनू नेणवानी, सुनील नेनवाणी, आदिनाथ गुगगुळे, संजय जाधव नरेश नेणवानी बजरंग आडने विशाल आठवले सुशीला आठवले संदीप सवनेकर पंढरीनाथ सवनेकर श्री तेलंगे दीपक नेनवाणी यांनी पुढाकार घेतला

# वसमत पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १८ ऑगस्ट**



श्री गणेश उत्सव व ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त शहरात ऐक्य व बंधुभाव जपत साजरे व्हावेत यासाठी शहर पोलीस ठाणे येथे शांतता समितीची बैठक शहर पोलीस ठाण्यात पार पडली. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची ढिलाई सहन केली जाणार नाही, असा कडक संदेश दिला.

बैठकीदरम्यान पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शहरात कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्या कुठल्याही व्यक्तीवर कठोर कारवाई केली जाईल. सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्यांना थेट तुरुंगात धाडले जाईल. धार्मिक भावना भडकावणारे कृत्य करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून शिक्षा होईपर्यंत सोडले जाणार नाही. पोलीस प्रशासनाने उत्सव मंडळांना कडक सूचना दिल्या आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच ईद मिरवणुका नियमांचे काटेकोर पालन करूनच पार पडल्या पाहिजेत. ध्वनीप्रदूषण, वाहतूक कोंडी आणि अनुचित घोषणाबाजीवर शून्य सहनशीलतेची भूमिका घेण्यात येईल. कोणत्याही प्रकारची अराजकता, वादविवाद किंवा भांडण झाल्यास थेट गुन्हा दाखल होईल.

बैठकीत पोलीस अधीक्षकांनी दिलेला ठणकावलेला इशारा असा की - सण साजरा करा पण शांततेत! नियम मोडले तर पोलीस प्रशासन कारवाई करण्यास मागे हटणार नाही. या बैठकीमुळे शहरात नागरिकांमध्ये सुरक्षितता व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून येणारे दोन्हीही सण शांततेत आणि ऐक्याने साजरे होतील, असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला.बैठकीला विविध धर्मीय मान्यवर नागरिक, धार्मिक नेते, उत्सव मंडळांचे पदाधिकारी, व्यापारी, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच पोलीस अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने प्रशासनास पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी मुख्याधिकारी आशुतोष चिंचवडकर, उपपोलीस अधीक्षक केंद्रे, पोलीस निरीक्षक सुधीर वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन बोराटे, विवेक गुंडरे, इमरान कादरी मा. नगराध्यक्ष शिवदासजी बोड्डेवार, माजी नगरसेवक अजगर पटेल, माजी नगरसेवक सचिन दगडू, ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीचे अध्यक्ष अतिख पापुलर, मौलाना जाहेद शरीफ, प्रभाकर क्षीरसागर तसेच मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# हद्दपार आरोपीची पुन्हा दहशत, फरशी व चाकूने दोघांवर हल्ला करून केले जखमी

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १८ ऑगस्ट**

येथे मोहम्मद अली चौक भागातील हॉटेलवर किरकोळ कारणावरून धारदार शस्त्राने व फरशी ने डोक्यात मारहाण करून दोघांना जखमी केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी शेख अर्शद कुरेशी यांचे फिर्याद वरून पाच जणांवर खुनाचा प्रयत्न करत गुन्हा दाखल वसमत शहर पोलीस ठाण्यात करण्यात आला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

शहरातील शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धक्का बसला आहे. गुन्हेगारी कारवायांमुळे सहा महिन्यासाठी जिल्ह्यातून हद्दपार केलेला कुख्यात आरोपी शेख अल्ताफ व त्याचे साथीदारांची दहशतीने पुन्हा शहरात नागरिकांमध्ये प्रचंड भीती व धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा आरोपी पुन्हा अवैध धंदे, धमक्या, मारामाऱ्या करताना दिसत असून सर्वसामान्य जनता हादरली आहे.

हद्दपार करूनही हा आरोपी परत शहरात कसा आला? पोलिस डोळे झाकून बसले आहेत का? कायदा मोडणाऱ्यांना मोकाट सोडले तर जनतेचे आयुष्य धोक्यात येईल.

जिल्ह्यातून सहा महिन्यासाठी हद्दपार असूनही आरोपी मोकाट फिरत आहे, यावरून स्पष्ट होते की काहींना राजकीय पाठबळ व पोलिसांची सौम्य भूमिका आहे. अशा आरोपीमुळे शहरात पुन्हा दहशतीचे साम्राज्य निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पोलिस प्रशासनाकडे गुप्तचर यंत्रणा नाही का? हद्दपार आदेश फक्त कागदापुरता राहिला का? सामान्य नागरिकांचे रक्षण कोण करणार? नागरिकांन मध्ये जोरदार चर्चा असून या आरोपीविरुद्ध तात्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

आरोपींमध्ये शेख अल्ताफ, असीम कुरेशी, शेख शाहरुख, शेख वसीम, व अन्य एका वर गु. र. न.५४६/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९,११८,(२),११८(१),११५ (२),२५२,३५१(२),(३),१८९ (२),१९१(२)(३),१९० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# सहा सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपारीचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ ऑगस्ट**

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत तसेच आखाडा बाळापूर पोलिस ठाणे हद्दीत अवैध दारू विक्री करणाऱ्या दोन टोळ्यांना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्यातून हद्दपारीचे आदेश काढले आहेत.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्यात टोळीने सराईत गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या विरूध्द कडक कार्यवाहीची भूमिका धेतली असून गुन्हे करणाऱ्या विरूध्द प्रभावी प्रतिबंध कार्यवाही करण्यात येत आहे.

ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत राहणारे सराईत गुन्हेगार बिलाल कासीम प्यारेवाले रा गारमाळ, दिनेश उर्फ बालाजी वामन पवार रा कलगाव, वैजनाथ नामदेव मुकाडे रा संतुक पिंप्री, जगन माधव काशिदे रा उमरखोजा यांचे विरूध्द ग्रामीण पोलिस ठाण्यात शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द अवैध दारू विक्रीचे विविध गुन्हे दाखल आहेत त्यावरून पोलिस निरीक्षक एस पी डोंगरे यांनी नमुद आरोपीविरूध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलिस कायदान्वये हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. तसेच आखाडा बाळापूर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे सराईत गुन्हेगार देविदास लालजी आडे रा भाटेगाव, तुकाराम राघोजी डुकरे रा सुकळीवीर यांच्याविरूध्द आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात अवैध दारू विक्रीचे विविध गुन्हे दाखल आहेत. त्यावरून पोलिस उपनिरीक्षक राम गोणारकर यांनी नमुद आरोपीतांविरूध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलिस कायदान्वये हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. नमुद प्रकरणांची सविस्तर तपासणी करून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी त्यांना प्राप्त अधिकारानुसार सराईत वरील सहाही गुन्हेगारांना तीन महिन्याकरिता जिल्ह्यातून हद्दपारीचे आदेश काढले आहेत.

# गणेशवाडी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ ऑगस्ट**

शहरातील गणेशवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत सोमवारी शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. ही जिल्हा परिषद शाळा सध्या डिजीटल करण्यात आली असून या शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे टॅब तसेच स्क्रीनवर शिक्षणाची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे. शिक्षण घेत आहेत. यावेळी माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# लेंडी प्रकल्पाच्या धरण क्षेत्रात ढगफुटी

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १८ ऑगस्ट -**

मुखेड तालुक्याच्या लेंडी प्रकल्पाच्या धरण क्षेत्रात रविवारी रात्री ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने रावणगाव, हसनाळ, भिंगोली, भेंडेगाव भासवाडी, मारजवाडी हे गाव अक्षरशः पाण्याखाली गेली आहेत. आतापर्यंत जवळपास २५० जणांना राज्य आपत्ती निवारण दलाच्या जवानांनी लहान बोटींच्या साह्याने बाहेर काढले असून अजूनही नागरिक पुराच्या पाण्यात अडकलेले आहेत. यात प्रचंड वित्तहानी झाली असून मौजे हसनाळ येथे जिवितहानी झाली असल्याचा संशय आहे. तसेच अनेक म्हशी, गुरे जनावरे वाहून जाऊन मृत्यू झाला आहे. मात्र जीवित हानीची अद्यापही अधिकृत माहिती आलेली नाही.

बाऱ्हाळी - मुक्रमाबाद - उदगीर व कर्नाटक सीमा भागात पडलेल्या मुसळधार पावसाने लेंडी नदीला पूर आला. पुनर्वसनाचे काम पूर्ण झालेले नसताना लेंडी आंतरराज्य प्रकल्पाची गळभरणी करून ३३% पाणी अडविण्याची व्यवस्था केलेली आहे. गळभरणी करत असताना लेंडी प्रकल्पग्रस्त नागरिकांनी अगोदर पुनर्वसन नंतर धरण ही मागणी करून गळभरणीचे कामास विरोध केला. मात्र प्रशासनाने संचारबंदी लागू करून गळभरणीचे काम केलेले आहे. रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी मध्यरात्री पूर परिस्थिती अधिकच बिकट झाली त्यामुळे भेंडेगाव, भिंगोली, हसनाळ, रावणगाव , भासवाडी , मारजवाडी पुराच्या पाण्याखाली गेली. रावणगाव, हसनाळ , भासवाडी या गावातील २०० ते ३०० जण अडकले. त्यांच्या मदतीसाठी प्रशासनाने तातडीने राज्य आपत्ती निवारण दलाच्या दलाला पाचारण करण्यात आले. त्यांनी सकाळी सहा वाजल्यापासून आतापर्यंत लहानबोटीच्या साह्याने २५० पेक्षा जास्त महिला व नागरिकांना बाहेर सुरक्षित काढण्यात यश मिळविले आहे. अजूनही अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी जवान कार्यरत आहेत .या महापुराने गावात सहा गावातील गावकऱ्यांचे महत्त्वाची कागदपत्रे, अन्नधान्य, संसार उपयोगी साहित्य , गुरे - जनावरे वाहून गेले आहेत. यात काही जण दगावल्याची भिती व्यक्त होत आहे. पण अद्यापही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. घटनास्थळी उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार राजेश जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी उपस्थित राहून मदत कार्यावर लक्ष ठेवून आहेत. मूख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आ.डॉ.तूषार राठोड यांनी घटनेची माहिति दिली. तर घटनास्थळी खासदार रवींद्र चव्हाण , माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, यांनी भेटी देत परिस्थितीची माहिती घेतली आहे.राज्य आपत्ती निवारण दलाचे पोलीस उपनिरीक्षक सूधिर शिरसाठ,पोलीस उपनिरीक्षक ब्रिजकिशोर सिंह यांच्या नेतृत्वाखाली चाळीस जवान कार्यरत आहेत.



# हाणेगाव परीसरात शेतकऱ्यांचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. १८ ऑगस्ट -**



देगलुर तालुक्यासह हाणेगाव परीसरात मागील चार पाच दिवसापासुन सतत पावसाच्या रिमझीममुळे संपुर्ण जनजीवन विस्कळीत झालं असून तोंडाला आलेलं पिक मुग उडीद जातय की काय असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

सुरुवातीला मृग नक्षत्रात पेरणी योग्य पाऊस पडल्यामुळें शेतकऱ्यांनी कापुस सोया मुग उडीद तुर आदी पीकावर जास्त भर देत पेरणी केले मग मध्येच बरेच दिवस उघाड दिला आणि आता रीमझीम पाऊस पडत एका रात्रीतच ढगफुटी पावसामुळे परीसरातील तलाव ओवरफ्लो होऊन बरीच शेती पाण्याखाली गली आहे व परीसरातील आनेक गावांचा संपर्क तुटला असुन हाणेगाव शिळवणी जाणाऱ्या तलाव लगत पुलाचा संपुर्ण बांध पाण्यात वाहून गेल्यामुळें दळणवळण व्यवस्था बंद झाली आहे. निसर्गाचा नियम कुनास ठाऊक म्हणी प्रमाणे यंदा तलाव भरतील की नाही उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळतय की नाही अशी चर्चा असतानाच अचानक पावसानं रुद्र रुप धारण करत एका रात्रीतच अक्षरशः ढगफुटी सारख्या पावसामुळे तळे नदी नाले ओवरफ्लो झाले असुन शेतकऱ्यांची उभी पिके पाण्यात वाहुन गेली आहेत यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले आहे. म्हणुन संबधीत विभागाने परीसरातील वझर, कुलडी, शिळवणी, खुतमापुर, कोकलगाव, सोमुर, येडुर, मानुर, बेम्बरा, बिजलवाडी, रमतापुर, कुन्मारपली,लोणी, चव्हाणवाडी, सुभाषनगर आदी गावात झालेल्या नुकसानीकडे गांभिर्याने लक्ष देऊन नुकसान भरपाई द्यावी अशी चर्चा शेतकरी वर्गातुन होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांचे पोर्णिमानगर येथे प्रवचन

**नांदेड**-श्री ष. श्री. १०८ श्री शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूर कपिलेश्वर तीर्थक्षेत्र यांचे संगीत रूद्र पुजा व प्रवचन इंदिरा सार्वजनिक वाचनालयाच्या प्रांगणात श्री बसवलिंग संगीत रूद्र मंडळ यांच्या



सहकार्याने संयोजक बी.जी.देशमुख व सौ. ज्योती बालाजीराव देशमुख यांनी शिवानंद शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन दि.२५ ऑगस्ट रोजी सोमवारी सकाळी ११ ते २ या वेळेत आयोजित केले आहे. या प्रसंगी आ.हेमंत पाटील, आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंद बोंढारकर, संदीप भारती (पीआय), सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुस्से, ग्रंथालय राज्य तपासणी अधिकारी प्रताप सुर्यवंशी, नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सुर्यवंशी, माजी जि.प.अध्यक्ष संभाजी धुळगंडे, माजी जि.प.सदस्य शिवाजीराव कदम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती संयोजक शिवसेना राज्य ग्रंथालय सेलचे अध्यक्ष बी.जी. देशमुख यांनी दिली. प्रवचनाचा कार्यक्रम संपल्यानंतर महा आरती, प्रसाद, भक्तांना आशिर्वाद व दर्शनाचा वेळ ठेवण्यात आला आहे. यावेळी मान्यवरांच्या सन्मानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा भक्तांनी लाभ घ्यावा असे बी.जी. देशमुख, सौ.ज्योती देशमुख, शंकर खंदारे, तमलूरकर यांनी केले आहे.

### हिमायतनगर येथील कावड यात्रेचे आयोजन

**नांदेड**-सहस्त्रकुंड धबधबा ते हिमायतनगर (व१ाढोणा) पाई कावड यात्रा



हिमायतनगरच्या वतीने दि.०१८ चौथ्या श्रावण सोमवारी हर हर महादेव.... जय श्री रामनामाच्या गजरात शहरात दाखल झाली. यात हजारो कावडधारी युवकांनी हाती भगवे झंडे, कावडधारी सहभागी झाले होते. कावड यात्रा शहरात येताच फटक्याच्या आतीषबाजी करण्यात आली.यावेळी मंदिर परिसर प्रभू श्री रामनामाच्या जयघोषाने दुमदुमल्याचा अनुभव अनेकांना आला आहे. प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी येथील कावड यात्रा काढण्यात आली भव्य कावड यात्रेत युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला होता. मागील अनेक वर्षापासून श्रावण मासात सोमवारच्या मुहूर्तावर सहस्त्रकुंड - इस्लापूर ते हिमायतनगर अशी कावड यात्रा काढण्यात येत आहे. यात सहभागी होण्यासाठी हिमायतनगर शहरासह परिसरातून रविवारी सायंकाळी हजारो युवक सहस्त्रकुंड येथील बाणगंगा महादेव मंदिर परिसरात जमा झाले. सोमवारी सकाळी ५ वाजताच युवकांनी गंगास्नान करून हर हर महादेव च्या गजरात येथील महादेवाचे दर्शन घेऊन प्रभू श्री रामचंद्राच्या जयघोषाने कावड यात्रा प्रस्थान झाली. कावड यात्रेसमोर रामचंद्राच्या गीतांचा संच त्यामागे भगवे पताका धरून युवक व कावड धारी युवक सहभागी झाले होते. त्यानंतर सदर कावड यात्रा हिमायतनगर शहरात दाखल होताच नागरिकांनी पुष्पवृष्टी तसेच फटक्याची आतिषबाजी करून कावड यात्रेचे जंगी स्वागत केले. कावड यात्रेतील युवक श्री परमेश्वर मंदिरात दाखल होऊन गंगाजलाने श्री परमेश्वर व शहरातील अनेक देवी - देवतांचे दर्शन घेतले . हिमायतनगर शहरासह परिसरातील युवक सामील झाले. यावेळी पोलीस प्रशासना कडून बंदोबस्त ठेवण्यात आला.

### चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान

**देगलूर**-वारकरी संप्रदायातील थोरसत्पुरुष, सद्गुरू चंद्रशेखर



महाराज देगलूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या शिष्य परिवाराकडून रक्तदान शिबीर संपन्न झाले. वारकरी संप्रदायाचे महामेरू आध्यात्मिक श्रेत्रातील गाडे अभ्यासक चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त देगलूर येथील धुंडामहाराज मठ संस्थान येथे दि १७ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी तेलंगाणा,कर्नाटक, महाराष्ट्र या तीनही राज्याच्या सीमेवरील त्यांच्या शिष्यांनी मोठ्याप्रमाणात रक्तदान केले. सद्गुरू चंद्रशेखर महाराज देगलूरकर सेवा मंडळा तर्फे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात झाले. या शिबिरात ११० पेक्षा अधिक जणांनी रक्तदान केले. गोळवलकर गुरुजी रक्तकेंद्र,नांदेड या रक्तपेढी अंतर्गत हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील व त्यांच्या धर्म पत्नी माजी नगरसेविका सौ अनघा महेश पाटील, माजी नगरसेवक दिंगबर कडलवार , हणमंत कडलवार यांनी श्रावण महिन्यातील उपवास असतानासुद्धा रक्तदान शिबीरात रक्तदान करून योगदान दिले यावेळी ऋतुपर्ण चंद्रशेखर महाराज ,माजी नगराध्यक्ष मोगलांनी शिरशेटवार, शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, ह.भ.प दत्तात्रय जानते सर , ह भ.प दामोदर देशाई केरुरकर, कृष्णा जोशी , देशमुख पॅथालॉजीचे श्रीनिवास देशमुख, श्रीनिवास कुलकर्णी कुन्मारपल्लीकर ,शिवाजी पाटील शिंदे, युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे, दिंगबर कडलवार , रमाकांत जोशी, विनायक पोतदार, संतोष देगलूरकर आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी ह.भ.प लक्ष्मीकांत महाराज यांनी पुढाकार घेतला.

# जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ ऑगस्ट -**

जिल्ह्यात मागील तीन दिवसापासून सतत पाऊस सुरु आहे. अनेक तालुक्यात अतिवृष्टीग्रस्त पाऊस झाला आहे. यामुळे विष्णुपूरी प्रकल्प क्षेत्रात पाऊस आणि विसर्ग दोन्हीही वाढले आहेत. विष्णुपूरी प्रकल्पाच्यावरच्या भागातील सिध्देश्वर व येलदरी धरण भरले आहेत. त्यांचा विसर्गही वाढलेला आहे. त्यामुळे विष्णुपूरी धरणाचे ८ गेट उघडले असून ९४ हजार क्युसेस वेगाने विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. हा विसर्ग आता वाढविण्यात येणार असून १ लाख २५ हजार क्युसेकने विसर्ग सोडण्यात येणार आहे. त्यामुळे नांदेड शहर व नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा गावांनी सतर्क राहावे. नागरिकांनी अत्यंत महत्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

आतापर्यत ५ नागरिक बेपत्ता असून त्यांचा शोध सुरु आहे. जनावरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

# हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मांडणार: आ. आनंद बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १८ ऑगस्ट -**

हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मांडणार असल्याचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भायेगाव येथील हनुमान मंदिर सभागृहाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना आपले मत व्यक्त केले.

भायेगाव येथील हनुमान मंदिर सभागृहाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना आमदार आनंदराव पाटील बोंढारकर म्हणाले की त्यासाठी मी स्वतः जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करून मराठा आरक्षणासाठी शासनाशी कळवले होते.पुन्हा एकदा मराठा समाजासाठी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात प्रश्न मांडणार असल्याचे आनंदराव पाटील बोंढारकर यांनी सांगितले.तसेच भायेगाव हे माझे असून गावातील अंतर्गत राहिलेले रस्ते लवकरच पूर्ण करतो. व पांदण रस्ते पण लवकरच होणार आहेत.व सभागृह मंदिर समोरील पेव्हर ब्लॉक लवकरच होईल. हनुमान मंदिर सभागृहासाठी १० लक्ष रुपयांच्या कामाचे भूमिपूजन १७ ऑगस्ट रोजी नांदेड दक्षिणचे शेतकरी पुत्र आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात



आले. यावेळी शहरप्रमुख तुलजेश यादव, सिडको शहरप्रमुख सुहास पा्. खराणे, मा.जि.प.शिवाजी पा.कदम, मा.उपसरपंच संभाजी जाधव, सुरेश पा.जाधव, बाळू पा. ब्राह्मणवाडेकर, माजी सरपंच बबनराव पा. कदम त्यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरपंच प्रतिनिधी बालाजी पा.भायेगावकर केले. आभार प्रदर्शन कोल्हे सर यांनी केले. यावेळी उपसरपंच बालाजी कोल्हे, ग्रामपंचायत सदस्य उर्मिला खोसडे, शिवाजी खोसडे, गौतम भालेराव, तंटामुक्त अध्यक्ष त्रिंबक कोल्हे, मा.उपसरपंच अशोक पा.कोचार, कोल्हे शाखाप्रमुख चांदु पुयड, शिवानंद खोसडे, भानुदास कोल्हे, पांडुरंग कोचार, संभाजी कोल्हे, संभाजी खोसडे, गंगाधर खोसडे, जिवनाजी पुयड, एकनाथ खोसडे व गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पावसाच्या तडाख्याने शेततळीचं रूप; टाकळी तमा, मुगांव, होटाळा परिसरातील शेती पाण्याखाली!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १८ ऑगस्ट -**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नायगांव तालुक्यातील टाकळी तमा, होटाळा व मुगाव या गावांच्या शिवारातील शेती जलमय झाली असून, शेतजमिनींना अक्षरशः तलावाचे स्वरूप आले आहे. विशेषतः नदी लगत असलेल्या शेतांमध्ये पाणी साचून राहिल्याने मुग,

उडीद ,कापूस, सोयाबीन या मुख्य पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

पिके नुकतीच जोमाने वाढू लागली होती. मात्र, पावसाचे प्रमाण इतके वाढलेकी शेतातील निचऱ्या चे मार्ग बंद होऊन पाणी मुरले. त्यामुळे उभ्या पिकां ची घुसमट होत असून. अनेक पिके खराब होण्याच्या मार्गावर आहेत. गेल्या दोन



महिन्या पासू न या परिसरातील शेतकर्यांनी रात्रंदिवस कष्ट करून घेतलेली शेती एका रात्रीच्या पावसाने उद्ध्वस्त झाली आहे. शेतकरी आपल्या व्यथा व्यक्त करताना म्हणाले, की आम्ही रात्रंदिवस मेहनत करून पिके उभी केली, पण निसर्गाच्या लहरीपणासमोर आमचे काहीच चालत नाही. आता सरकारने तरी आम्हाला तातडी ची करून न्याय द्यावा.

१या नैसर्गिक आपत्तीमुळे काही गरिबांच्या घरांमध्ये ही पाणी शिरल्याचे वृत्त आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून, नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी शासना कडे तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची आणि प्रशासनाने आवश्यक उपाययोजना त्वरित राबवण्याची मागणी केली आहे.

## मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि. १८ ऑगस्ट -**

गेल्या तीन दिवसापासून सतत धार ढगफुटी दृश्य निर्माण होऊन नदी नाल्यांना पूर येऊन अनेकांच्या कुटुंबाच्या घरात पावसाचे पाणी शिरल्यामुळे अतोनात नुकसान झाले आहे.

# लोह्यात तृतीय पंथीयांचा अनोखा विवाह सोहळा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १८ ऑगस्ट -**

तृतीय पंथीय अर्थात किन्नर समुदायाकडे पाहण्याचा समाजाचा वेगळाच दृष्टिकोन असतो. इतरांच्या बरोबरीने त्यांना समाजात स्थान मिळत नाही. त्यांना कुटुंब व्यवस्था नसते त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाचा अभाव आणि व्यसनाधीनता पहावयास मिळते. विशेष म्हणजे त्यांच्यात मोठ्या प्रमाणात सांघिक एकता असते. शहरातील एका मंगल कार्यालयात एका तृतीय पंथीयाचा आगळा वेगळा विवाह सोहळा रितीरिवाजानुसार अगदी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

समाजात स्त्री पुरुषांबरोबर तृतीय पंथीय वर्ग देखील असतो. तृतीय पंथीयाना पुरुषांप्रमाणे मेहनतीचे काम होत नाही आणि स्त्री सारखे सुंदर दिसत असले तरी ते स्त्रियांसारखा विवाह करू शकत नाहीत. ते केवळ टाळी वाजवून पैसे मागतात आणि त्या बदल्यात ते आशीर्वाद देतात. त्यांना समाजाकडून हिणवल्या जाते, झिडकारल्याही जाते. त्यांचा विवाह हा त्यांची दैवत असलेल्या बोहचरा माता यांच्यासोबत होतो. गुजरात राज्यातील मूळ असलेली माता बहुचरा देवी ही तृतीय पंथीय समुदायाची संरक्षक देवी मानली जात असल्याने तृतीय पंथीयात बहुचरा मातेला अन्यासाधारण महत्त्व आहे. तृतीय पंथीय बहुचरा मातेसोबत विवाह करतात.



असाच एक सोनी देवकरचा आगळा वेगळा विवाह सोहळा लोहा शहरातील एका मंगल कार्यालयात दि. १५ ऑगस्ट रोजी रात्री रितीरिवाजानुसार उत्साहात साजरा झाला. प्रारंभी हळदी समारंभ नंतर विवाह विधी आणि त्यानंतर रुचकर जेवणाची मेजवानी. संपूर्ण विवाह सोहळ्याची प्रक्रिया पार पडल्यानंतर नाचगाण्याचा कार्यक्रम पार पडला. विशेष म्हणजे याप्रसंगी उपस्थित तृतीय पंथीय समुदायाकडून बहुचरा मातेचे पूजन करून समाधानकारक पाऊस होऊ दे, बळीराजा सुखी होऊ दे, सर्वत्र खुशहाली होऊ दे म्हणून साकडे घालण्यात आले. सदर विवाह सोहळ्यास जिल्ह्यासह पर जिल्ह्यातून जवळपास शंभर तृतीय पंथीय समुदायाची मंडळी गोळा झाली होती. सदरील कार्यक्रम हा देवकर गुरू नजर यांच्या अधिपत्याखाली झाला. यावेळी रूपा देवकर, शिवणी देवकर, गौरी गुरु (मानवत) जोया देवकर, कल्याणी देवकर, नयनतारा देवकर सह बहुसंख्येने तृतीय पंथीयातील मंडळी हजर होती.

सदरील अनोखा व आगळा वेगळा विवाह सोहळा पाहण्यास बहुसंख्येची उपस्थिती होती.

# श्रीक्षेत्र उमरज देवस्थानाची सेवा अखंडीत ईमानदारी पुर्वक करत राहणार :आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १८ ऑगस्ट -**

जिल्हासह महाराष्ट्रात प्रसिध्द आसणारे श्रीसंत नामदेव महाराज मठसंस्थान श्रीक्षेत्र उमरज देवस्थान ची परंमपरागत चालत आलेली सेवा ईमानदारी पुर्वक अखंडीत पणे कायम करत राहणार असे प्रतिपादन अखंड हरीनाम सप्ताह सांगता कार्यक्रम प्रसंगी बोलताना कंधार लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांनी केले .

श्री क्षेत्र उमरज येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव व मठसंस्थानचे पहीले मठाधीपती संत नामदेव महाराज जन्मोत्सव निमित्य दिनांक ९ आगस्ट पासुन अखंड हरीनाम सप्ताह प्रारंभ झालेला होता त्याची सांगता दिनांक १६ आगस्ट रोजी मठाधिपती महंत एकनाथ नामदेव महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली या प्रसंगी आमदार चिखलीकर यांनी मठाधीपती एकनाथ



महाराज यांचा आहेर देऊन सन्मान करुन आशिर्वाद घेतले पुढे बोलताना आमदार चिखलीकर असे म्हणाले या मठसंस्थास आजपर्यत माझ्या माध्येमातुन भरघोस विकास नीधी उपलब्ध करुन देण्याचे भाग्य मला लाभले यापुढे ही आमच्या कुटूंबाची चालत आलेली या देवस्थान वरील श्रेध्दा परंमपरा गत कायम ठेवून ईमानदारी पुर्वक सेवा चालु ठेवत वेगवेगळ्या माध्येमातुन भरघोस असा निनी उपलब्ध करुन देणार असे शेवटी चिखलीकर म्हणाले

या कार्यक्रमाला मुखेड कंधार चे आमदार तुषार राठोड ,राष्ट्रवादी काग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटिल चिखलीकर विजय धोडगे, मुक्तेश्वर धोंडगे, संजय भोसीकर, दत्ता वाले, मधुकर डांगे, नवनाथ पाटिल तोरणे, विनोद पाटिल तोरणे, परसराम तोरणे, शंकरराव नाईक, सुनिल कांबळे, निलेश गौर, व्यकटराव नागमवाड, विलास सांगवे, बालाजी तोरणे, राजेश भुत्ते , काशिनाथ तोरणे ,एकनाथ तोरणे बालाजी पवार यांच्या सह पंचक्रोशीतील भाविकभक्त मोठ्या संख्येनी उपस्थितीत होते .

# अतिवृष्टीग्रस्त भागात तातडीने मदत पुरवा : खा. डॉ. अजित गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ ऑगस्ट -**

जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागात हाहाकार उडाला आहे . हजारो हेक्टर वरील पिके पाण्याखाली गेली असून मानवी जीवितहानीसह पशूंचीही मोठी हानी झाली आहे . अशा परिस्थितीत शेतकरी आणि ग्रामस्थांना धीर देण्यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी जिल्हाधिकारी , उपजिल्हाधिकारी, महसुली यंत्रणा , तहसील यंत्रणा, पोलीस विभाग यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून प्रत्येक गावात पुराच्या पाण्यात अडकलेल्या प्रत्येक नागरिकाला तातडीने मदत पुरवा. ज्या ज्या भागाला पुराचा फटका बसला आहे त्या भागाचे तात्काळ पंचनामे करा आणि प्रत्येकाला दिलासा द्या असे निर्देश दिले आहेत.

गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे . देगलूर , मुखेड तालुक्यातील हसनाळ , रावणगाव भोकसखेड , भिंगोली , भेंडेगाव, भासवाडी , मुक्रमाबाद परिसरातील अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे येथील नागरिक पुराच्या पाण्यात अडकले आहेत. पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांना तातडीने सुखरूप आणि सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे यासाठी रात्रीच खा. डॉ. अजित गोपछडे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी संपर्क साधून सूचना केल्या. देगलूर चे उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांच्याशीही त्यांनी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. एवढेच नाही तर प्रशासनाला सतत दक्ष राहण्याच्या सूचना देत अतिवृष्टीग्रस्तभागात कोणतीही जीवित हानी होणार नाही यासाठी ही उपाययोजना कराव्यात असे निर्देश त्यांनी दिले आहेत. एन डी आर एफ चे पथक तैनात करण्यात आले असले तरी एनडीआरएफच्या आणखीन तुकड्या मागवाव्यात , पुरात अडकलेल्या नागरिकांना रेस्क्यू करण्यासाठी गरज पडल्यास राज्य सरकारकडून हेलिकॉप्टरची मदत घ्यावी यासाठी आपणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यातील कोणत्याही गावात जीवित हानी होणार नाही यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी . ज्या भागात कठीण परिस्थिती आढळून येत आहे त्या भागातील नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे असे निर्देशही त्यांनी दिले आहेत. दरम्यान पुराच्या पाण्यात ज्या पशुधनाची जीवित हानी झाली आहे त्या पशुमालकांना तातडीने आर्थिक मदत करावी असे निर्देश देत खा. डॉ. गोपछडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्याला ही आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करू . परंतु आपत्कालीन परिस्थितीत शेतकरी आणि नागरिकांनी सावध राहावे . पूर प्रवण क्षेत्रापासून संरक्षित ठिकाणी आणि सुरक्षित स्थळी रहावे. शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही मात्र सुरक्षेच्या उपायोजना करून घ्याव्यात असे आवाहन त्यांनी केले आहे.